




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. ०३ डिसेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०२१ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# राड्यात मतदान, २१ तारखेला निकाल

## २६४ नगर परिषद:पंचायतींत ६५% मतदान; वाद हाणामारी, दगडफेकीच्या किमान ८० मोठ्या घटना



**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

राज्यातील २६४ नगर परिषद, नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर रोजी अंदाजे ६५ टक्के मतदान झाले. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद आणि नागपूर खंडपीठाने मंगळवारी दिलेल्या आदेशानुसार या मतदानाचा निकाल न्यायालयीन अपिलामुळे लांबणीवर पडलेल्या २४ नगर परिषद, पंचायत तसेच १५४ सदस्यांसाठीच्या निवडणुकीनंतर म्हणजे २१ डिसेंबरला लागणार आहे. आधी २४ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि नंतर मतमोजणीचा निकाल लांबणीवर पडल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वच राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक पातळीवरील राजकारणाला दिशा देणाऱ्या आणि सामान्य कार्यकर्त्यांना ताकद देणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ५-१० वर्षांनंतर झाल्या. बहुतांश ठिकाणी महायुतीतच वर्चस्वाची लढाई होती. त्यामुळे अनेक ठिकाणी मतदानाच्या दिवशी राडा झाला. वाद, हाणामारी, दगडफेकीच्या किमान ८० मोठ्या घटना घडल्या. बीडच्या शाहुनगर येथे बोगस मतदानावरून अजित पवार गट, शरद पवार गटात दगडफेक झाली. गेवराईत भाजपचे माजी आ. लक्ष्मण पवार व अजित पवार गटाचे जयसिंह पंडित एकमेकांच्या अंगावर धावून गेले. महाडमध्ये शिंदेसेना-अजित पवार गट वाद उफाळला. थेट पिस्तूल रोखण्याचाही आरोप झाला. मुक्ताईनगरात मतदान केंद्राच्या हद्दीत प्रवेशावरून केंद्रीय मंत्री रक्षा खडसेंनी पोलिसांना सुनावले. दिवसभर युती खडसे समर्थकांमध्ये सहा वेळा वाद झाला. त्यात राष्ट्रवादीचे नेते आ. एकनाथ खडसे, आमदार चंद्रकांत पाटील यांच्यात शाब्दिक चकमक झाली. शिंदेसेनेचे मंत्री गोगावलेंचा मुलगा विकास यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे समर्थक सुशांत जांबरे व कार्यकर्त्यांत हाणामारी झाली. वाहन फोडण्यात आले. विकास यांनी पिस्तूल रोखल्याचा आरोप तटकरे समर्थकांनी केला. एकुणात जे काही घडले ते यंत्रणेचे अपयश आहे. गेल्या २५-३० वर्षांत मी स्थानिक स्वराज्य संस्थांत असा प्रकार पाहिला नाही. हे फारच चुकीचे घडले आहे. निवडणूक आयोगाने प्रक्रियेत सुधारणा करावी.

राज्य निवडणूक आयोग महायुती सरकारच्या हाताचे बाहुले झाले आहे. या सरकारच्या इशाऱ्यावरच आयोग काम करीत आहे. **- विजय वडेट्टीवार**

राज्यात आज जो काही मोठा गोंधळ निर्माण झाला आहे त्यासाठी निवडणूक आयोगासह भाजपदेखील तेवढाच जबाबदार आहे. **- रोहित पवार**

उद्धव-आयोग, न्यायालयावर न बोललेलेच बरे. राज-देशात मनमानी सुरू आहे. आदित्य-निवडणूक आयोगाची सर्कस सुरू आहे का? **- उद्धव - राज - आदित्य ठाकरे**

## थोडक्यात...

### तेरा वर्षांच्या मुलीवर दोघांकडून अत्याचार

बेळगाव (समर्थ गांवकरी) : सातवीत शिकणाऱ्या 13 वर्षांच्या मुलीवर अत्याचार झाल्याच्या घटनेची नोंद मंगळवारी (दि. 2) झाली आहे. मुरगोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावाला लागून असलेल्या शेतवडीत 23 नोव्हेंबर रोजी ही घटना घडल्याचे अत्याचारित मुलीच्या पालकांनी फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी पोलिसांनी या गावातीलच मणीकंठ दिन्नीमनी व इराण्णा संकमण्णावर या दोघा तरुणांवर 'पोक्सों'तर्गत गुन्हा दाखल करून तातडीने अटक केली. न्यायालयासमोर उभे केले असता त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली. याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी, 23 नोव्हेंबर रोजी शाळेला सुट्टी असल्याने मुलगी घरी होती. तिला आईने गिरणीत जाऊन दळण ठेवण्यास सांगितले. मुलगी पिठाच्या गिरणीकडे जात असताना दबा धरुन बसलेल्या उपरोक्त दोघा नराधमांनी तिला उचलून बाजूच्या उसाच्या शेतात नेले. तिथे तिच्यावर सामूहिक अत्याचार केला.

### हायवेशेजारचे एटीएमच पळवले

बेळगाव (समर्थ गांवकरी) :रस्त्याशेजारी असलेले एटीएम चोरट्यांनी पळवून नेल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. मात्र, एटीएम फोडून त्यातील रक्कम काढता आल्याने सुमारे 200 मीटरवर नेऊन चोरट्यांनी ते एटीएम झाडीत फेकून दिले. त्यामध्ये 1 लाख 10 हजारांची रक्कम असल्याची माहिती एटीएम व्यवस्थापनाने दिली आहे. काकतीजवळील न्यू वंटमुरी येथे मंगळवारी पहाटे हा प्रकार घडला. अधिक माहिती अशी, इंडिया वन या एजन्सीने न्यू वंटमुरी येथे राष्ट्रीय महामार्गालगत एटीएम बसवले होते. मंगळवारी पहाटेच्या सुमारास तिघा बुरखाधारी चोरट्यांनी जागेवरच आधी एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला.

# अनंत गर्जेने भिंतीवर डोके आपटत घरात खिडकीतून प्रवेश केला

## त्याच्या अंगावर २८ ताज्या जखमा; पोलिस तपासात धक्कादायक पुरावे समोर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



मुंबईतील गौरी पालवे मृत्यू प्रकरणात नवनवीन माहिती समोर येत असून या प्रकरणाने मोठे वळण घेतले आहे. गौरीचा मृत्यू झाल्याची माहिती अनंत गर्जेपर्यंत पोहोचताच त्याने मानसिक धक्क्याच्या अवस्थेत स्वतःचे डोके भिंतीवर आपटण्याचा प्रयत्न केल्याचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले आहे. यामुळे त्याच्या डोक्याला जखमा झाल्याची पुष्टी अधिकृतपणे झाली आहे. त्याचबरोबर, अनंतने खिडकीतून घरात प्रवेश केला होता, अशीही माहिती तपासात पुढे आली आहे. या खिडकीला बसवण्यात आलेल्या जाळीतून नेमके कसे प्रवेश करता येते, याचे प्रात्यक्षिकही पोलिसांनी संबंधित व्यक्तीकडून करवून घेतले आहे. त्यामुळे घरात प्रवेश करताना काय घडले आणि ते का घडले? याचा तपास अधिक गतीने सुरू आहे. गौरी पालवे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक स्वरूपात समोर आले असले, तरी या घटनेमागील कारणांची मालिका अधिक धक्कादायक असल्याचे तपासात स्पष्ट होत आहे. गौरीच्या मृत्यूनंतर तिच्या माहेरकडील नातेवाईकांनी तिच्या सासरच्या लोकांवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळातही या घटनाक्रमाची मोठी चर्चा सुरू आहे. कारण अनंत गर्जे हे भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांचे पीए म्हणून कार्यरत होते. त्यामुळे या प्रकरणाकडे राजकीय परिणामांच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. गौरी आणि अनंत यांच्या वैवाहिक आयुष्यातील वाद, भावनिक ताणतणाव व परस्परांतील मतभेदांचा या मृत्यूशी संबंध आहे का? हे तपासणे पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले आहे.

# २५ हजार मतदार इकडून तिकडे; प्रभाग बदलावर मनपाची कबुली

**छत्रपती संभाजीनगर: (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीवर आतापर्यंत 4,344 हरकती प्राप्त झाल्या. त्यापैकी 1,920 हरकतींचा निपटारा केला आहे. उर्वरित हरकतींची तपासणी सुरू आहे. मनपाचे प्राधिकृत अधिकारी आणि प्रगणक हे हरकतींची स्थळावर जाऊन पडताळणी करत आहेत. हरकतींच्या तपासणीत सुमारे 25 हजार मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेल्याचे आढळले. मतदानाच्या दिवशी होणाऱ्या गोंधळापेक्षा आज झालेला गोंधळ बरा आहे. नागरिकांनी घेतलेल्या आक्षेपांवर सुधारणा करून पारदर्शक निवडणूक घेण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी मंगळवारी (2डिसेंबर) पत्रकार परिषदेत सांगितले. आयुक्त म्हणाले, मतदार यादी शुद्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, मोघम स्वरूपाच्या हरकतींची पडताळणी शक्य नाही. मतदार यादीत नाव वाढवणे किंवा कमी करणे हे महापालिकेच्या अधिकारात नाही. त्यामुळे अधिकाराच्या मर्यादेत राहूनच शुद्धीकरण केले जात आहे.

छत्रपती संभाजीनगरात प्रभागरचनेनुसार प्रथमच निवडणूक होत असल्याने मोठ्या प्रमाणात हरकती येणे अपेक्षित होते.

दुबार मतदारांची यादीही प्रसिद्ध केली आहे. ती झोन कार्यालय, निवडणूक कार्यालय आणि ऑनलाइन उपलब्ध आहे. दुबार मतदारांनी झोन कार्यालयात जाऊन आपले मतदान केंद्र लेखी स्वरूपात कळवावे लागेल.

# घायवळ टोळीच्या अजय सरोदेच्या घरी सापडली ४०० काडतुसे

**पुणे: (समर्थ गांवकरी)**



पुणे शहरातील गुन्हेगारी जगतात नावाजलेल्या नीलेश घायवळ टोळीविरोधात पोलिसांनी मोहीम उघडली असून या तपासात धक्कादायक माहिती समोर येत आहे. घायवळ टोळीचा सक्रीय साथीदार अजय सरोदे याच्या घरातून 400 काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. त्यापैकी 200 जिवंत काडतुसे, तर 200 रिकाम्या पुंगळ्या असल्याचे पोलिसांनी सांगितले. कोथरूड पोलिसांनी अजय सरोदे आणि त्याचा आणखी एक साथीदार बटर्या चौधरी यांना तीन दिवसांपूर्वी गाणगापूर (कर्नाटक) येथून ताब्यात घेतले होते. चौकशीत त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी ही कारवाई केली असून, या सर्व घडामोडींमुळे पुन्हा एकदा पुण्यात दहशत पसरली आहे. 17 सप्टेंबर रोजी कोथरूड भागात घायवळ टोळीने एका तरुणावर सरळ गोळीबार केला होता. त्या घटनेच्या वेळी अजय सरोदे हा घटनास्थळी उपस्थित असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्या गुन्ह्यात देखील अजय आरोपी म्हणून सामील आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, अजय सरोदे याच्याकडे कायदेशीर पिस्तुल परवाना देखील आहे. 29 जानेवारी 2024 रोजी त्याला हा परवाना पोलिसांनी दिल्याची माहिती समोर आली आहे. परवानाधारक असूनही त्याच्या घरी एवढ्या मोठ्या प्रमाणावर दारुगोळा आढळल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# अहिल्यानगरचा देवव्रत महेश रेखे सर्वांत तरूण वेदमूर्ती

## ५० दिवसांत दंडक्रम पारायण पूर्णः काशी नगरीत २०० वर्षांनी महाराष्ट्राने पुन्हा घडवला इतिहास; पंतप्रधान मोदींकडून अभिनंदन

**मुंबई/नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



अवघ्या 19व्या वर्षी अहिल्यानगरचा देवव्रत महेश रेखे या तरुण वेदमूर्तीने 50 दिवस दोन हजार वेदमंत्रांचे अखंड म्हणजे दंडक्रम पारायण करून इतिहास घडवला. 200 वर्षांत हा विक्रम नोंदवणारा महेश भारताचा दुसराच आणि सर्वांत तरुण वेदमूर्ती ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही लक्ष वेदमूर्ती देवव्रतच्या या वेदपराक्रमाने वेधले. आणि मंगळवारी पंतप्रधानांनी त्याचे खास अभिनंदन केले. देवव्रतने दंडक्रम पारायणम 50 दिवसांत पूर्ण करून 200 वर्षांत प्रथमच हा विक्रम महाराष्ट्राच्या नावे नोंदवला. ऐतिहासिक योगायोग असा की यापूर्वी दोनशे वर्षांपूर्वी नाशिकचे वेदमूर्ती नारायणशास्त्री यांनीच हा विक्रम नोंदवला होता. या दोन शतकांच्या दरम्यान नारायणशास्त्री विस्मृतीत गेले आणि देवव्रतने हे अत्यंत कठीण पारायणम पूर्ण करून इतिहासाला नवा उजाळा दिला. 12 ऑक्टोबर ते 30 नोव्हेंबर असे 50 दिवस वल्लभराम शालीग्राम सांग्वेद विश्वविद्यालयात त्याने हे पारायणम पूर्ण करताच देव्रतला वेदमूर्ती म्हणून मानाची पगडी घालण्यात आली. आणि त्याच्या मनगटावर सोन्याचे कडे चढवले गेले.

शुक्ल यजुर्वेदाच्या मध्यंदिनी शाखेचे 2000 मंत्र 50 दिवसांत कोणताही खंड न पाडता म्हणणे याला दंडक्रम पारायण असे म्हणतात. हे सर्व मंत्र मुखोद्गत म्हणायचे असतात. त्यातही उलट-सूलट आणि सलग क्रमाने ते विशिष्ट स्वरात व्याकरण, छंद आणि अचूक उच्चारांसह म्हणावे लागतात. शंकराचार्य दिवंगत चंद्रशेखरानंद सरस्वती 'महापेरिया' यांनी या प्रक्रियेचे वर्णन करताना म्हटले की, याच दंडकर्म पारायण पध्दतीने अलिखित वेध पिढ्यान्पिढ्या त्यांच्या मूळ स्वरूपात टिकू शकले.

### मोदींकडून कौतुक

एक्स वरील आपल्या संदेशात पंतप्रधान म्हणाले की, केवळ 19 वर्षे वयाच्या वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांनी केलेल्या या कार्याची आठवण येणाऱ्या अनेक पिढ्या ठेवतील. भारतीय संस्कृतीविषयी प्रेम असणाऱ्या सर्वांना त्यांनी दंडक्रम पारायण पूर्ण केल्याबद्दल त्यांचा खूप अभिमान आहे. दंडक्रम पारायणात अनेक वैदिक मंत्र व ऋचा अचूक म्हणणे अपेक्षित असते. आपल्या उच्च गुणवत्तेच्या गुरु परंपरेचे हे एक अद्वितीय उदाहरण आहे. हे अद्वितीय कार्य काशीच्या पवित्र नगरीत पार पडले याचा काशी नगरीचा खासदार म्हणून मला खूप आनंद आहे. देवव्रत महेश रेखेंच्या कुटुंबीयांना, तसेच त्यांच्या पाठीशी असलेल्या देशभरातील साधू, संत, पंडित तसेच अनेक संस्थांना माझा प्रणाम!

# नेहा पवार आत्महत्या प्रकरणातील नवा धागा

## जादूटोणा करणाऱ्या मांत्रिकाला अटक

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

पंचवटीतील नेहा पवार हिच्या आत्महत्येने संपूर्ण शहराला हादरवून सोडले होते. सात पानी चिठ्ठी लिहून केलेल्या या आत्महत्येमागे अनेक त्रास, मानसिक दबाव आणि अंधश्रद्धा यांचे सावट असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले होते. नेहाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (म.अं..निस) तसेच अनेक सामाजिक संस्थांनी या प्रकरणाचा सखोल तपास करण्याची मागणी केली होती. त्यानुसार पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवत हिरावाडी येथून एका मांत्रिकाला अटक केली आहे. ही माहिती अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी दिली.

नेहा पवार हिच्या आत्महत्येशी संबंधित असलेल्या विविध बाबींची छाननी करताना पोलिसांना एक महत्त्वाचा धागा मिळाला. आत्महत्येच्या कारणांमध्ये कौमार्य चाचणी, अंधश्रद्धा, तसेच जादूटोणा या गोष्टींचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले होते.

विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि महाराष्ट्र अंनिस यांनी विशेष हस्तक्षेप करत पोलिसांना या कोनातून तपास वाढवण्याची विनंती केली होती.



त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपी संतोष पवार यांच्या घराची झडती घेतली असता जादूटोणाचे साहित्य मोठ्या प्रमाणात आढळले. घरातून नागाच्या आकाराचा खिळा, त्याला आरपार केलेला काळा बिबा, विविध प्रकारचे गंडेदोरे, ताईत, तसेच जादूटोण्यामध्ये वापरले जाणारे साहित्य मिळाले. हे साहित्य कुठून आणले, असा प्रश्न पोलिसांनी आरोपींना विचारला असता त्यांनी हिरावाडी परिसरातील एका भोंदूबाबाचे नाव सांगितले. माहितीनुसार, मयत नेहा पवार हिच्या माहेरातून काही राखेसारखी भस्माची पुडी आणली होती. ही पुडी घरात अडचणी निर्माण करते, अशा प्रकारचे अंधश्रद्धाजन्य भय निर्माण करून तिच्यावर मानसिक दबाव आणण्यात आला होता.

# मतदान कक्षातच पूजाअर्चा! नगराध्यक्ष पदाच्या भाजप-राष्ट्रवादी उमेदवारांवर गुन्हा दाखल

## वडगाव मावळात आचारसंहितेचा भंग

**वडगाव मावळ : (समर्थ गांवकरी)**

वडगाव नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज झालेल्या मतदान प्रक्रियेच्या सुरुवातीला मतदान केंद्रामध्ये येऊन मतदान यंत्रा कक्षाची पूजाअर्चा करून आचारसंहितेचा भंग व परमार्थिक दूषणाचा विषय निर्माण होईल असे कृत्य केल्याप्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी नगराध्यक्ष पदाच्या भाजप व राष्ट्रवादीच्या उमेदवारांसह माजी नगराध्यक्षांवर गुन्हा दाखल केला आहे. भाजपच्या उमेदवार ॲड.मृणाल गुलाबराव म्हाळसकर, राष्ट्रवादीच्या उमेदवार अबोली मयुर ढोरे व माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे या तीन जणांवर गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी मतदान केंद्राध्यक्ष नवनाथ दळवी व भागवत झांबरे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिस निरीक्षक अभिजीत देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज वडगाव नगरपंचायत निवडणुकीसाठी शहरातील २४ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली. यापैकी रमेशकुमार साहनी इंग्लिश स्कूलमध्ये असलेल्या प्रभाग क्रमांक ६ व प्रभाग क्रमांक ८ या दोन मतदान केंद्रांमध्ये जाऊन



मतदान केंद्राध्यक्ष दळवी व भागवत यांनी मज्जाव केला असताना मृणाल म्हाळसकर, अबोली ढोरे व मयुर ढोरे यांनी दोन्ही प्रभागाच्या मतदान केंद्रातील मतदान कक्षाची पूजाअर्चा केली.

# दिव्यात जीवघेण्या हल्ल्यात एकाचा मृत्यू तर एक गंभीर

## परप्रांतीयांची दहशत तर महीना भरातील दुसरी घटना

**ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिव्यात परप्रांतीयासह टोळक्याकडून दोघांवर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे त्यात एकाचा दुर्दैवी मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. दिवा शहरातील गणेश पाड्यात रात्री ९ : १५ वाजताच्या सुमारास परप्रांतीयासह एका अल्पवयीन टोळक्याकडून दोन तरुणांवर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. दिवा शहरातील महिना भरातील ही दुसरी घटना घडली आहे. प्रकरणी ६/७ अल्पवयीन आरोपीनां मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. दिवा शहरातील गणेश पाड्यात अभिजीत भास्कर पाटील ( वय 22) राहणार काळूबाई चाळ व सुमित गावडे ( वय 22) राहणार गणेशपाडा, दातीवली, दिवा ठाणे या दोघांवर अल्पवयीन टोळक्यातील मुख्य आरोपी पंडित (काल्पनिक नाव ) यासह इतर ६/७ जणांच्या टोळक्याने धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले. गंभीर जखमी झालेला अभिजीत पाटील ( वय 22 ) याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून जखमी सुमित गावडे वर कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णलयात उपचार सूरु आहेत. ठाणे महानगर पालिका हद्दीतील दिवा शहरातील गणेश पाडा, गणेश नगर, दिवा पूर्व येथील घटना आहे. प्रकरणी काही आरोपी पळून गेले असून मुख्य आरोपीसह ६/७ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास व कारवाई सुरु आहे. परिणामी आज गणेशपाडयात बंद ठेवण्यात आला होता. मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास सुरु करण्यात आला असून मदतीत फॉरेन्सिक लॅब घटनास्थळी दाखल झाले होते. प्रकरणी शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्री उशिरा अभिजित पाटील यावर शोकाकुल वातावरणात अंतिमसंस्कार करण्यात आले. अभिजीतच्या मागे निवृत पोलीस कर्मचारी वडील, आई व लहान भाऊ आहे.






जुन्नर तालुका : राष्ट्रीय स्थायी विकास संस्था (NISD) इंडिगो एअरलाईन्स व अफार्म पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ११ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान जुन्नर तालुक्यातील उंब्रज,खामुंडी,पिंपरी-पेंढार,डुंबरवाडी आणि ठिकेकरवाडी येथील ग्रामसंघातील महिला कृषी उत्पादक गट यांना पीक काढणी पश्चात तंत्रज्ञान शेती माल प्रक्रिया प्रशिक्षण यामध्ये पीक काढणी नंतर पिकाची कशी काळजी घ्यावी वअल्पखर्चीक कृषी तंत्रज्ञान क्षमता बांधणी या संदर्भात प्रशिक्षण संस्था अध्यक्ष डॉ.प्रकाश पाळंदे,स्मिता पवार,अभिजित मदने यांच्या मार्गदर्शनानुसार देण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...



### माऊली महाराज क्षीरसागर यांचे किर्तन संपन्न!

अकोले **(स. गांवकरी)** : अकोले तालुक्यातील अतिदुर्गम भाग म्हणून ओळख असलेल्या एकदरे येथे सालाबादप्रमाणे चालु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह च्या सहाव्या दिवसाची किर्तनरूपी सेवा बालगोपाल वारकरी शिक्षण संस्था कावनई येथील माऊली महाराज क्षीरसागर यांच्याकडे देण्यात आली.त्यांच्या सर्व बालगोपाल वारकरी चिमुकल्यांनी सह ग्रामस्थ, महिला भगिनी तसेच तरुणांनी या किर्तनाचा आनंद घेतला. वैष्णव महाराज मुंढे वाकी यांची तालबद्ध मृदुंगाला साथ मिळाली. रात्री ९ ते ११ या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.या किर्तनासाठी गावातील सर्व भजनी मंडळ तसेच महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पहारेकरी व अन्नदाते बाळू भांगरे,बाळू तळपे,काळू भांगरे,नंदु भांगरे,खंडू भांगरे,ठकुबाई कुलाळ,रामदास भांगरे,धोंडू भांगरे,भाऊसाहेब भांगरे,विठ्ठल भांगरे,संपत तळपे,लक्ष्मण तळपे,अनिल पोटे,लहू पोटे, सुनील पोटे,भागा सखाराम भांगरे,संपत भांगरे, गणपत भांगरे,काळू तळपे,हिरामण धराडे, आनंदा भांगरे यांसह पंचक्रोशितील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मकर विलक्कु उत्सवात अयप्पा मंदिरात शिव आराधना प्रवचन संपन्न

अहिल्यानगर **(स. गांवकरी)** : अहिल्यानगर येथील अयप्पा मंदिरात ६० दिवसीय मंडल- मकरविलक्कु वार्षिक उत्सवास सुरवात झाली आहे. त्यानिमित्त रोज धार्मिक कार्यक्रम होत असून यामध्ये ३ दिवसीय दिव्य ज्योती जागृती संस्थान द्वारे भगवान शिव आराधना या प्रवचनाचे ३ दिवसीय आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अमोघनंद महाराज यांनी आपल्या मधुर वाणीतून शिव कथा सांगून भाविकांचे प्रबोधन केले आहे. ३ दिवसात महाराज म्हणाले दिव्य ज्योति जाग्रति संस्थान एक सामाजिक व आध्यात्मिक संस्था आहे, त्याचे संस्थापक आशुतोष महाराज आहेत. संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगिन विकासासाठी सामाजिक व आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. याच श्रृंखले अंतर्गत अय्यप्पा मंदिरामध्ये अय्यप्पा सेवा समितीच्या वतीने शिव आराधन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शाश्वत धर्मग्रंथ व भजनांच्याआधारे खालील सर्व प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला भगवान शिवजी कोणत्या भक्तीने प्रसन्न होतात , भगवान शिवजीचे दिव्य स्वरूप समाजाला कोणती शिकवण देत आहे , ग्रंथानुसार शिवतत्त्व प्राप्त करून देणारा भक्तीचा शाश्वत मार्ग कोणता , वर्तमानकाळात शिवतत्त्वाचे दर्शन संभव आहे का , भगवान शिवजींनी गुरूगीतेमध्ये खऱ्या सद्गुरूची ओळख सांगितली आहे. ती कोणती ,ग्रंथानुसार ध्यानाची (Meditation) शाश्वत पध्दत कोणती या व अशा सारख्या अनेक प्रश्नांची समाधान कारक उत्तरे दिली. ६० दिवसाच्या या मंडल-मकरविलक्कु उत्सवात मंदिरात दररोज विविध कार्यक्रमांचे आयोजन तसेचरोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.सर्व नागरिकांनी या कार्यक्रमांना उपस्थित राहून अध्यात्मिक पर्वतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अय्यप्पा सेवा समितीचे अध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, सचिव वसंत सिंग,उपाध्यक्ष राजू लक्ष्मण, सेक्रेटरी के.उदयकुमार व खजिनदार पी. सत्यान नायर आदींसह भाविक भक्तांनी केले आहे.



### दिव्यांग क्रिकेटीसाठी आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा मोलाचा पाठींबा!

ठाणे **(स. गांवकरी)** : ठाण्याचे माननीय आमदार व मुंबई क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. श्री. जितेंद्र आव्हाड साहेब यांना अपंग संजीवनी सोशल वेलफेयर फाउंडेशन आणि ठाणे क्रिकेट अँड स्पोर्ट्स क्लबच्या प्रतिनिधींतर्फे दिव्यांग क्रिकेटीअर व DCPL (Disabled Cricket Premier League) ला पाठिंब्याबाबत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये फाउंडेशनचे संचालक व ठाणे क्रिकेट अँड स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष व कर्णधार श्री. सुरेश दुधाने, ठाण्याचे क्रिकेट क्षेत्रातील सुप्रसिद्ध महर्षी, ठाणा भूषण व प्रशिक्षक श्री. शशिकांत नाईक सर, सौ. वनिता फडतरे (सामाजिक न्याय बोर्ड समन्वयक, महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख सल्लागार – अपंग संजीवनी सोशल वेलफेयर फाउंडेशन) आणि समाजसेवक आप्पा फडतरे उपस्थित होते. अपंग क्रिकेटपटूंना आमदार निधी आणि मुंबई क्रिकेट असोसिएशनद्वारे सहकार्य मिळावे, या संदर्भात पत्र देताच डॉ. आव्हाड यांनी दिव्यांग क्रिकेटीअर व DCPL उपक्रमाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी दिव्यांग खेळाडूंसाठी फाउंडेशनद्वारे चालविण्यात येणाऱ्या उत्साहवर्धक व प्रोत्साहनपर कार्याचे विशेष कौतुक केले. डॉ. आव्हाड यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे ठाण्यातील दिव्यांग क्रिकेटपटूंसाठी नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. या सहकार्याच्या मदतीने दिव्यांग क्रिकेट खेळाडूंच्या क्रीडा क्षमतांना नवे व्यासपीठ उपलब्ध होण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे.

# 'स्पेक्ट्रोस्कोपी' विषयावरील कार्यशाळा संपन्न

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रसायनशास्त्रसंकुलात 'स्पेक्ट्रोस्कोपी' या विषयावरची एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. रसायनशास्त्र संकुल, शिमाडझू एक्सलन्सइन सायन्स ॲनालिटिकल इंडिया प्रा. लि. आणि तोशविन ॲनालिटिकल प्रा. लि., मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेचे उद्‌घाटन रसायनशास्त्र संकुलाच्या सेमिनार हॉलमध्ये नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर वानखेडे आणि डॉ. ओमप्रकाश येमूल यांची उपस्थिती होती. संशोधक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेदरम्यान तज्ज्ञांनी युव्ही-विजिबल स्पेक्ट्रोस्कोपी आणि एफ.टी.आय.आर. स्पेक्ट्रोस्कोपी यांच्या मूलभूत सिद्धांतांसह उपकरणांची कार्यपद्धती, नमुना, विश्लेषण, तंत्र, डेटा, इंटरप्रिटेशन तसेच संशोधनातील आधुनिक उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कॉपिकल इंडिया प्रा. लि.च्या अप्लिकेशन स्पेशलिस्ट दीप्ती शेट्टी यांनी एफ.टी.आय.आर. ची मूलतत्त्वे, उपकरणाची रचना आणि नव्या अनुप्रयोगांची ओळख करून दिली. तर तोशविन ॲनालिटिकल प्रा. लि., मुंबईचे रिजनल टेक्निकल स्पेशलिस्ट राजेश कांबळे यांनी यू.व्ही.एफ.टी. आय.आर. उपकरणांच्या मूलभूत देखभालीसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या. कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणांची ओळख करून देणे, संशोधन कौशल्य वाढवणे आणि उद्योगमान्य तांत्रिक ज्ञान प्रदान करणे हा होता. दुसऱ्या सत्रात तोशविन ॲनालिटिकल प्रा. लि., मुंबईचे सर्विस इंजिनिअर शशिकांत चव्हाण आणि विभागीय व्यवस्थापक श्याम कामत यांनी विद्यार्थ्यांना

प्रात्याक्षिके (हँड्स-ऑन ट्रेनिंग) दिले तसेच युव्ही-विजिबल स्पेक्ट्रोस्कोपी उपकरणाचे प्रात्यक्षिक दाखविले. या कार्यशाळेमुळे विद्यापीठातील संशोधन पायाभूत सुविधा अधिक बळकट होऊन विद्यार्थ्यांना आधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळण्यास मोठी मदत होईल, असे रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोने यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमाणपत्र वितरण आणि आभार प्रदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी रोहिदास दुधाटे, सीमा डूबेवार, रमेश मन्नेरवार आणि ऋषिकेश पवार या संशोधक विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# गोदावरी परीक्रमासाठी नगरी सज्ज

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

भारतातील देवभूमी मनहून ओळख असलेल्या विविध राज्यातून ३००साधू संत गोदावरी परीक्रमा करणार असून ही परीक्रमा नांदेड जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या हदगांव तालुक्यातील पिंपळगाव येथील श्री दत्त मंदिर ला दिनांक ७ डिसेंबर ला येणार असून या परीक्रमा साठी पिंपळगाव नगरी सज्ज झाली.

श्री संत गोदावरी परीक्रमा अनन्त श्री विभूषित श्री मज्ज्दगद्गुरू द्वाराचार्य श्री अग्र पीठाधीश्वर एवं मलूक पीठाधीश्वर परम पूज्य स्वामी श्री राजेंद्र दास देवाचार्यजी महाराज (श्री रेवासा-वृंदावन धाम) यांच्या सानिध्यात ३०० साधू संत नाशिक, पेठण, दत्तमंदिर पिंपळगाव, मंचेरीयाल, वानम, कव्हचरू, नंदिपेठ, परळी वैजनाथ, दत्तसंस्था देगवड, परत नाशिक ला जाणार ही परीक्रमा दिनांक ७ डिसेंबर ला दत्तमंदिर पिंपळगाव येथे येणार असून दिनांक ८ रोजी संत प. पू. स्वामी श्री राजेंद्र दास देवाचार्यजी महाराज यांच्या प्रवचन होणार. या परिक्रमा ची रूप रेषा दिनांक ५ डिसेंबर रोजी सुरु होऊन दिनांक २१ डिसेंबर ला नाशिक येथे सांगता होणार.

@ गोदावरी परिक्रमा साठी येणाऱ्या साधू संत च्या स्वागत साठी प.पू. सद्धर्म शिरामणी गोवत्स्य श्री बालयोगी व्यंकट स्वामी महाराज दत्तसंस्थान मठ पिंपळगाव यांनी पुढाकार घेऊन जिल्यातील लोकप्रतिनिधी सोबत चर्चा करून होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली.

# जूऱ्या इमारतीला भीषण आग : लाखो रुपयांचे नुकसान



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील बुरूड गल्ली (बांबू गल्ली) येथील एका जूऱ्या इमारतीला मंगळवारी सकाळी भीषण आग लागली. या आगीत इमारत पूर्णतः भस्मसात झाली असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी हानी झालेली नाही. महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली आहे. बांबू गल्ली येथील आनंद चंगेडिया यांच्या मालकीच्या जूऱ्या इमारतीला मंगळवारी सकाळी ७ वा.च्या सुमारास भीषण आग लागली. प्राथमिक अंदाजानुसार सदरची आग ही शॉर्ट सर्किटमुळे लागली असल्याचे सांगितले जात आहे.

संपूर्ण सागवान लाकडाच्या या इमारतीला आग लागल्यानंतर आगीने रौद्ररूप धारण केले. आगीचे आणि धूराचे लोळ बाहेर पडत होते. आग लागल्याचे समजताच महापालिका अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.

# सीताराम सारडा विद्यालय वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

- शिक्षणा बरोबरच गुणवंत खेळाडू घडविण्याचे कार्य हिंद सेवा मंडळ करीत आहे : जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

वार्षिक क्रीडा महोत्सव हा सर्वांना आनंदाचा दिवस असतो. सर्व विद्यार्थ्यांना आवडणारा खेळाचा तास,खेळाचे शिक्षक असतात. प्रत्येक विद्यार्थ्याला कुठल्यातरी खेळाची आवड निर्माण व्हावी.यासाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते.

खेळामुळे सुदृढ आरोग्य निर्माण होते.सारडा महाविद्यालयातून एशियन खेळामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आदित्य धोपावकर याची निवड झाली आहे.तसेच प्रणिता सोमन या विद्यार्थिनीने शिवछत्रपती पुरस्कार मिळविला आहे.तसेच भारताच्या क्रिकेट क्षेत्रात नावलौकिक मिळवणारे खेळाडू जहीर खान हे देखील श्रीरामपूर येथील हिंदसेवा मंडळाचे विद्यार्थी आहेत. शिक्षणा बरोबरच गुणवंत खेळाडू घडविण्याचे कार्य हिंद सेवा मंडळ सातत्याने करीत आहे.असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले आहे.

सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात हिंदसेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयाचा वार्षिक क्रीडा मेळावा मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.या क्रीडा मेळाव्याचे उद्‌घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आले.तसेच मान्यवरांच्या हस्ते हवेत फुगे सोडून व कबुतरे मुक्त करून स्पर्धेचे मोठ्या थाटात उद्‌घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती राखीव पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉक्टर पारस कोठारी, शाळेचे चेअरमन अजित बोरा, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी, सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे,नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे, सीताराम सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक डोळसे,क्रीडा शिक्षक रामकृष्ण कुलकर्णी, चंद्रशेखर वाघ,दीपक आरडे,संजय शेकडे, अमोल कदम,विनोद जोशी, प्रवीण लोखंडे,रवींद्र चोभे,गणेश नागपुरे,दिपाली लगड, क्रांती मुंदानकर आदी उपस्थित होते.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, सीताराम सारडा विद्यालयाचा क्रीडा मेळावा मोठ्या उत्साहाने दरवर्षी पार पडत असतो. विद्यार्थ्यांनी प्रत्येक खेळामध्ये सहभाग घ्यावा व यश मिळवावे. क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी खेळाडूंना निर्माण झाली आहे.चांगले गुणवंत खेळाडू घडावेत यासाठी सीताराम सारडा विद्यालयाच्या वतीने दरवर्षी खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाते.

पोलीस निरीक्षक उमेश परदेशी म्हणाले, अभ्यासाबरोबरच खेळ महत्त्वाचा आहे अहिल्यानगर मधून चांगले खेळाडू देशाला मिळाले आहेत.विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून जीवनात प्रगती करावी.

माहेश्वरी गावित म्हणाल्या अभिमानाने सांगावेसे वाटते की सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात सिताराम सारडा विद्यालय अग्रेसर आहे.दरवर्षी मोठ्या प्रमाणात वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन सारडा विद्यालयाच्या वतीने करण्यात येते.तसेच सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी प्रणिता सोमन व सानिया शेख यांनी शिवछत्रपती पुरस्कार मिळवून खेळाच्या माध्यमातून भारताचे नेतृत्व करीत आहेत.

प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी केले.तर रामकृष्ण कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रांती मुंदानकर यांनी केले. आभार चंद्रशेखर वाघ यांनी मानले. क्रीडा महोत्सवासाठी मोठ्या संख्येने पालक विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# वडझिरे ग्रामस्थांकडून शेंडेश्वर मंदिराच्या सुशोभीकरण उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गावाचे आराध्य दैवत असलेल्या पवित्र शेंडेश्वर मंदिराचे सभोवताली हाती घेतलेले सुशोभीकरणाचे काम अलीकडेच पूर्ण करण्यात आले असून या उपक्रमामुळे मंदिर परिसर अधिक आकर्षक, सुव्यवस्थित आणि ग्रामस्थांसाठी सोयीस्कर बनला आहे. मंदिर सभोवती बारा ब्रास पेव्हिंग ब्लॉक फरशी बसविण्यात आली असून यामुळे परिसरात स्वच्छता, सौंदर्य आणि सुविधा या तिन्हींची जोड प्राप्त झाली आहे.

मंदिर परिसरात गावातील दहाव्याचे विधीसह अनेक धार्मिक कार्यक्रम पार पडत असल्याने अधिक सोयीस्कर सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने मंदिराच्या दक्षिण बाजूस ३५ बाय १६ फूट आकाराचे नवीन पत्रा शेड उभारण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची वर्दळ असणाऱ्या या ठिकाणी छायाच्छादित जागा उपलब्ध झाल्याने सर्वांना मोठा दिलासा मिळाला आहे.

हे सुशोभीकरण कार्य पूर्णपणे स्वइच्छेने व अतिशय मनापासून करण्यात आले आहे.श्री.देवराम दादाभाऊ मोरे यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कै. दादाभाऊ नामदेव मोरे यांच्या स्मरणार्थ हे कार्य करविले, तर श्री. गंगाधर रामभाऊ चौधरी यांनीही आपल्या वडिलांचे – कै.रामभाऊ नामदेव चौधरी यांच्या स्मरणार्थ यात सहभाग घेतला. दोन्ही कुटुंबीयांच्या या सेवा भावी योगदानामुळे मंदिर परिसराचा संपूर्ण कायापालट झाला असून ग्रामस्थांनी याचे मनापासून स्वागत केले आहे.

या उत्तम कार्याची दखल घेत वडझिरे ग्रामस्थांसोबतच विविध मान्यवरांनीही दोन्ही कुटुंबीयांचे अभिनंदन केले. श्री वसंतराव मोरे पाटील, श्री. बापूसाहेब तोडकर, श्री मारुती रेपाळे, श्री. शिवाजीराव औटी श्री.पोपटराव शेटे श्री.संतोष दिघे श्री. बापूसाहेब दिघे सर, डॉ.राजकुमार एरंडे,श्री. गुजानंद निघुट,ज्येष्ठ विधिज्ञ श्री. विनायकराव करकंडे तसेच सेवानिवृत्त शिक्षक हरिभाऊ चौधरी सर यांनी दोन्ही परिवारांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांचे समाजसेवेसाठी आभार मानले. त्यांच्या या कार्यामुळे सामाजिक एकोपा, परंपरा आणि धार्मिक भावनेचे मूल्य अधिक दृढ झाल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. समाजसेवेच्या भावनेतून प्रेरित हा उपक्रम भविष्यातही असेच अनेक कामांसाठी आदर्श ठरेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. शेंडेश्वर चरणी सर्वांनी प्रार्थना करून भविष्यातही या कुटुंबीयांकडून अशीच नि:स्वार्थ सेवा समाजहितासाठी व्हावी,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दोन्ही कुटुंबीयांना ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.



# घारगाव येथे महात्मा जोतिराव फुले पुण्यतिथी उत्साहात साजरी

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



श्री दत्तकृपा शैक्षणिक व कृषी ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव येथे थोर समाजसुधारक महात्मा जोतिराव गोविंद फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन व त्यांच्या कार्याच्या स्मरणार्थ विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि शैक्षणिक वातावरणात संपन्न झाला. समाजातील अस्पृश्यता, अंधश्रद्धा, शिक्षणातील विषमता आणि विशेषतः स्त्रीशिक्षणासाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या महात्मा फुलेंच्या विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास दत्तकृपा शैक्षणिक संकुलाच्या सचिव सौ. अर्चनाताई पानसरे या प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होत्या.

आपल्या मनोगतात त्यांनी महात्मा फुलेंच्या कार्याचा जागर करत विद्यार्थ्यांनी शिक्षणाची खरी ताकद ओळखून समाजपरिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मच्छिंद्र गोंटे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी महात्मा फुलेंच्या समतावादी विचारसरणीचा सविस्तर आढावा घेतला.

"महात्मा फुले व सावित्रीबाई फुले दांपत्याने शिक्षणाच्या माध्यमातून सर्वसमावेशक समाज उभारणीचा मार्ग दाखवला. त्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल," असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून साईकृपा फार्मसी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सौ. नेहा गरुड उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना महात्मा फुलेंनी शिक्षणाच्या क्षेत्रात दिलेले योगदान समाजप्रगतीचा पाया असल्याचे सांगितले. "आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी तांत्रिक प्रगतीबरोबरच सामाजिक जबाबदारीही जोपासणे अत्यंत गरजेचे आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग प्रा. राठोड, प्रा. गायकवाड, प्रा. राजश्री शिंदे, वैशाली अवघडे, प्रा. ए. कर्णे, प्रा. सतीश शेलार, प्रा. गोरक्ष आहेर, प्रा. सत्यम गोरे, प्रा. स्वप्निल शिंदे, प्रा. तुषार कोळेकर व प्रा. निखिल गावडे आदी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कृष्णप्रिया शिर्के व वर्षा सुपेकर यांनी अत्यंत सुयोग्य पद्धतीने केले, तर प्रस्ताविकरण रणसिंग रमेश यांनी केले. एम.एड. व बी.एड. विभागातील विद्यार्थी यादव लहू, शेलार मयूर, प्रतिभा कांबळे, आचल नाडे, शामल चौरे व अतुल भोर यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुलेंच्या विचारांचे व कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.



मंगरूळपीर (जि. वाशिम) : ग्रामपंचायत अरक, तालुका मंगरूळपीर, जिल्हा वाशिम येथे आयोजित कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरी मंत्रालय प्रतिनिधी विष्णु बुरे यांच्या वतीने ह.भ.प. मधुकर मार्के महाराज यांचा शाल, श्रीफळ, दैनिक समर्थ गांवकरीची प्रत आणि पेन देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी गोवर्धन रामकृष्ण बुरे, मृदुंगाचार्य अविनाश केशव बुरे, समाजसेवक अजय गजानन बुरे, तसेच नवयुवक उद्योजक गोपाल सुभाष बुरे यांच्यासह ग्रामपंचायत अरक येथील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...

### सरपंच पती सह चार व्यक्तींवर कोयता गॅंग कडुन जीवघेणा हल्ला

■ जामखेड पोलीस स्टेशनला 307 गुन्हा दाखल

**जामखेड (स. गांवकरी) :** जामखेड तालुक्यातील झिक्री गावात सरपंच पती मिलिंद जीवडे व त्यांच्या चार साथीदारांवर तलवार, कोयता, रॉड व काठ्यांनी झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने एकच खळबळ उडाली आहे. रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहाराबाबत ग्रामसभेत व पंचायत समितीसमोर तक्रार करण्यात आली होती. याचाच राग मनात धरून आरोपी योगेश इथापे व त्याचे साथीदार घनश्याम कसाब, ऋषीकेश साळुंके, मयुर कसाब, अतुल कसाब आणि इतर 4–5 अनोळखी व्यक्तींनी नऊ ते दहा जणांच्या टोळीने जीवडे, त्यांचे चुलते आणि सोबतच्या लोकांवर हल्ला केला. तलवार व कोयत्याने केलेल्या वारांमुळे जीवडे गंभीर जखमी झाले, तर त्यांच्या सोबतच्या चौघांनाही मारहाण करून जखमी करण्यात आले. शिवाय दत्तात्रय साळुंके यांच्या चारचाकी गाडीचेही मोठे नुकसान करण्यात आले.जखमींवर जामखेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून जामखेड पोलीस स्टेशनमध्ये आरोपींविरुद्ध 307 सहित गंभीर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### सख्या भावांवर चाकूने वार; रूग्णालयात उपचार सुरू




**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** उपनगरातील समता नगर, केडगाव येथील एका कुटुंबात क्षुल्लक कारणावरून झालेल्या घरगुती वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. बायको व बहिणीच्या भांडणातून वाद वाढला आणि वडील, बहिण, मेहुणा आणि मेहुण्याचा भाऊ यांनी मिळून सख्ख्या भावावर चाकूने वार करून जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जखमी सलमान चव्हाण याच्या जबाबावरून चार जणांविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. घटनेतील जखमी सलमान चव्हाण (वय- २०) हा वॉचमन म्हणून काम करतो आणि समता नगर, केडगाव येथे कुटुंबासोबत राहतो. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सलमान याने सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार ही घटना २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी घडली असल्याचे सांगितले.

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी 'स्लॉट बुकिंग' अनिवार्य

## बाजार समितीकडून स्लॉट बुकिंग करण्याचे आवाहन

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**



कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) अर्थात भारतीय कापूस प्राधिकरण अंतर्गत किमान आधारभूत दरानुसार शासकीय कापूस हमीभाव खरेदी केंद्राकडे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी जाण्यापूर्वी आता स्लॉट बुक करणे अनिवार्य करण्यात आले असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत तालुका यांच्याकडून देण्यात आली आहे.

त्यामुळे आता कापूस उत्पादक शेतकऱ्यांना स्लॉट बुकिंग केल्यानंतर कापूस विक्री करता येणार आहे. याकरिता सर्व शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत यांच्याशी संपर्क करून आपला कापूस शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर आणावा. तसेच ज्या दिवशी शासकीय कापूस खरेदी केंद्रावर कापूस विक्रीचा सलॅट बुकिंग केला आहे. त्याच दिवशी आपली गाडी आणावी. काही कारणास्तव गाडी आणणे नाही जमल्यास तो स्लॉट बुक कॅन्सल करून ज्या दिवशी गाडी येईल, त्याच दिवशी नवीन स्लॉट बुकिंग आपल्या स्मार्ट फोनद्वारे 'कपास किसान' ॲप मधून स्लॉट बुकिंग करावी, असे आव्हान करण्यात आले आहे.

### स्लॉट बुकिंग करून कापूस खरेदी केंद्रावर आणावा

कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी स्लॉट बुकिंग करून कापूस शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर आणावा. सदरील केंद्राच्या क्षमतेपेक्षा अधिक कापूस नोंद झाल्यास यावर जागा उपलब्ध नाही, असा संदेश दिसेल. नोंदी संख्या जास्त असल्यास यावेळी शेतकऱ्यांनी पर्यायी तारखेचे स्लॉट बुक करावे, त्यानंतर संबंधित केंद्रात कापूस विक्री करता येईल.

**- काकासाहेब तापकीर, सभापती - कृ.उ.बा समिती, कर्जत तालुका**

### शेतकऱ्यांना 'कपास किसान'

आता कापूस उत्पादक शेतकरी थेट खरेदी केंद्रांवर जाऊन रांगेत उभे राहण्याऐवजी या ॲपद्वारे त्यांचे पीक विकण्यासाठी स्लॉट बुक करतील. त्यांना प्रथम त्यांची वैयक्तिक माहिती आणि पीक तपशील प्रविष्ट करावे लागतील. आणि त्यानंतर नियोजित वेळी केंद्रावर पोहोचून ते विकावे लागणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना तासन्तास वाट पाहावी लागणार नसून रांगेत उभे राहण्याची व वेळेची बचत होणार आहे. आणि घरबसल्या नोंदणी करणे शक्य होईल. 'कपास किसान' ॲप हा शेतकऱ्यांना फायदेशीर ठरणार आहे.

# ११ नगरपरिषदांमधील नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडीकरीता आज मतदान

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांमधील नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडीकरीता आज मंगळवार (दि. २) डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज झाली असून अधिकारी, कर्मचारी सोमवारी सायंकाळी मतदान केंद्रांवर रवाना झाले. जिल्ह्यातील ३ लाख ७२ हजार ५४३ मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्याची संधी प्राप्त झाली आहे. उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंदीस्त होणार असून बुधवारी (दि.३) होणाऱ्या मतमोजणीची तयारी देखील पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, सिन्नर, भगूर, ओझर, पिंपळगाव बसवंत, चांदवड, सटाणा, मनमाड, नांदगाव आणि येवला अशा ११ नगरपरिषदांकरीता निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येते आहे. गेल्या आठवडाभरापासून उडणारा प्रचाराचा धुरळा खाली बसला असून प्रचारतोफाही थंडावल्या आहेत. जिल्ह्यात नगरसेवक पदासाठी १०२८ तर नगराध्यक्षपदासाठी ६१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# उद्याची मतमोजणी रद्द, हायकोर्टाचा मोठा निर्णय, नवी तारीख जाहीर!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. काही नगरपरिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील जवळपास २० नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया पुढे ढकलली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला होणार होती. त्यामुळे सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

याबाबतचा सगळा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. आज मतदान झालं तरी त्याचे निकाल २१ तारखेला जाहीर करा. तसेच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० तारखेला निवडणूक संपल्यानंतर अर्धा तासाने जाहीर करता येतील. तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असे न्यायालयाने सांगितले. ज्या ठिकाणी निवडणूक रद्द झाली त्या ठिकाणी असलेल्या उमेदवारांना आत्ताच्या प्रक्रियेत जे निवडणूक चिन्ह मिळाले होते त्यांचे ते निवडणूक चिन्ह कायम राहणार आहे. मात्र, निवडणूक रद्द झालेल्या ठिकाणी उमेदवारांनी जे खर्च केले आहे त्यांची खर्चाची मर्यादा वाढवून देण्यात यावी ही मागणी न्यायालयाकडून मान्य झालेली नाही.घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत, त्याचा निकाल पुढे जातोय, हे पहिल्यांदाच होतंय. हे यंत्रणांचं अपयश आहे. निवडणूक आयोगाने प्रक्रियेत सुधारणा करावी. मी पहिल्यांदाच अशी निवडणूक पाहतोय. मतमोजणी पुढे ढकलणे हे मला तरी पटत नाही. हे अतिशय चूक आहे, माझी वैयक्तिक नाराजी मी व्यक्त केली होती ती कायद्यावर आधारित होती. माझी नाराजी निवडणूक आयोगावर नाही तर प्रक्रियेवर आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

# महादजी शिंदे विद्यालयाच्या स्काऊटचा लखनऊमध्ये डंका

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



लखनऊ येथे पार पडलेल्या डायमंड ज्युबिली ग्रँड फिनाले व 19 व्या राष्ट्रीय स्काउट-गाईड जांबोरीत श्रीगोंद्याच्या महादजी शिंदे विद्यालयातील ९ स्काऊट्सनी महाराष्ट्राचे उत्कृष्ट प्रतिनिधित्व करत चमकदार यश संपादन केले. या भव्य जांबोरीच्या उद्घाटनाला उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, तर शेकोटी कार्यक्रमाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. समारोप समारंभाची शान वाढवत भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी उपस्थित राहून सर्व स्काउट-गाईडांना प्रोत्साहन दिले. महादजी शिंदे विद्यालयासाठी अभिमानाची बाब म्हणजे कृष्णा औटी हा विद्यार्थी राष्ट्रपतींना मानवंदना देण्यासाठी महाराष्ट्राच्या बँड पथकात सहभागी झाला.

विद्यालयातील – कृष्णा आप्पा औटी, शाहिद अबिद खान, विरेन रोहिदास खेतमाळीस, आदित्य युवराज शिंदे, आरुष गौतम जगताप, श्रेयश राहुल वडमारे, श्रेयस मालिदास खराडे, श्रेयस विठ्ठल चोर या स्काऊट्सनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत विविध उपक्रमांमध्ये बहुमोल यश मिळवले. देशातील सर्व घटकराज्य व सर्व केंद्रशासित प्रदेश यातून ३३हजार स्काऊट गाईड सहभागी झालेले होते. यात श्रीलंका, मालदीव,नेपाळ, संयुक्त अमिरात,सौदी अरेबिया हेही देश सहभागी होते. स्काऊट्सनी कॅम्प क्राफ्ट, शेकोटी सादरीकरण, शोभायात्रा, नाईट हाईक, संचलन, बँड पथक, पायोनियरिंग प्रोजेक्ट, स्किल ओरामा, कलर पार्टी अशा विविध उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राचा मान उंचावला.

# शाश्वतीकरण विषयक प्रशिक्षणास आजपासून प्रारंभ

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्थेची शाश्वतता, जलस्रोतांची सुरक्षितता आणि प्रभावी पाणी व्यवस्थापन या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जिल्हा परिषद, ठाणेद्वारे जल जीवन मिशन (JJM) अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमास आजपासून सुरुवात करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमधील प्रत्येकी ५ प्रतिनिधी या प्रशिक्षणात सहभागी होत आहेत. याप्रमाणे एकूण २,१५५ प्रशिक्षणार्थी आहेत. हा प्रशिक्षण कार्यक्रम १ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ३५ बॅचेस मध्ये घेण्यात येत आहे. प्रभावी पाणी व्यवस्थापनासाठी जलस्रोतांची सुरक्षितता आणि शाश्वतता एकत्रितपणे साध्य करणे. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती (VWSC) सदस्यांची संस्थात्मक क्षमता वाढविणे आवश्यक आहे.

# डॉ. विलास खर्चे यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड

**राहुरी विद्यापीठ : (समर्थ गांवकरी)**



महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. विलास काशिनाथराव खर्चे यांची मा. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी निवड केली आहे. कुलगुरूपदी निवड होण्याआधी ते डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे संशोधन संचालक म्हणून 2017 पासून कार्यरत होते. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि ICAR- राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भूमी उपयोग नियोजन ब्युरो, नागपूर येथे मृदाशास्त्रात (भूमी संसाधन व्यवस्थापन) पीएच.डी. पूर्ण केली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठीची जाहिरात त्रिसदस्यीय निवड समितीने दि. 12 ऑगस्ट, 2025 रोजी प्रसिध्द करुन दि. 15 सप्टेंबर, 2025 पर्यंत अर्जाची मागणी केली होती. निवड समितीने आलेल्या अर्जातून 12 जणांची मुलाखत घेवून अंतिम पाच नावे मा. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे पाठविली होती. या अंतिम पाच जणांची मा. राज्यपाल महोदयांनी मुलाखत घेवून डॉ. विलास खर्चे यांची निवड कुलगुरुपदी केली. महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये डॉ. विलास खर्चे यांनी नऊ वर्ष विविध पदांवर सेवा दिलेली आहे. त्यात मायक्रोन्यूट्रिंएंट संशोधन प्रकल्पाचे प्रमुख, ICAR-AICRP-STCR प्रकल्प, सह प्राध्यापक, NATP नोडल अधिकारी आणि नियोजन अधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले आहे. नंतर त्यांची डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे प्राध्यापक म्हणून निवड झाली. त्यांनी अकोला कृषि विद्यापीठात विविध पदांवर काम करून आपला ठसा उमटवला आहे. यात मृदाशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख, नागपूर येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता आणि नोव्हेंबर 2017 पासून विद्यापीठाचे संशोधन संचालक म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्याकडे अधिष्ठाता (कृषि) चा पदभार दीड वर्ष होता.

आत्तापर्यंत त्यांनी दोन्ही विद्यापीठांमध्ये शिक्षण, संशोधन आणि विस्तारामध्ये 30 वर्षाची प्रदीर्घ सेवा दिलेली आहे. मृदाशास्त्र, भूमी संसाधन व्यवस्थापन, पेडोलॉजी, मृदा गुणवत्ता व आरोग्य, तसेच क्षारपड जमिनांचे व्यवस्थापन या विषयांमध्ये त्यांनी त्यांचा संशोधनाचा ठसा उमटवला आहे.

डॉ. खर्चे यांनी मृदा व एकात्मिक खत व्यवस्थापन यावर महाराष्ट्रातील शेतकर्यांसाठी शाश्वत शेतीसाठी उपयोगी ठरलेले असे संशोधन केले आहे. त्यांनी दीर्घकालीन मृदा गुणवत्तेतील बदल, संरक्षण तंत्रज्ञान आणि क्षारपड जमिन सुधारणा याबाबतीत महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांचे आत्तापर्यंत 123 संशोधन लेख, 166 विस्तार लेख आणि 53 पुस्तके/संशोधन पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांनी मृदा आरोग्य व्यवस्थापन, समस्या असलेल्या जमिनींसाठी आणि पिकांच्या एकात्मिक खत व्यवस्थापनावर अनेक तंत्रज्ञान शिफारसी दिल्या आहेत. ते 2017 पासून अकोला विद्यापीठाचे मोठे संशोधन प्रकल्प यशस्वीपणे, आयोजन, नियोजन आणि देखरेख करीत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पीक वाण, पीक उत्पादन तंत्रज्ञानाच्या शिफारशी विकसित केल्या आहेत. त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर संशोधनासाठी सामंजस्य करार घडवून आणले आहेत. त्यांनी आत्तापर्यंत 10 पीएच.डी., तसेच 24 M.Sc. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. ते विविध शैक्षणिक आणि संशोधन प्रकल्पांचे प्रमुख होते आणि काही बाह्य अनुदानित प्रकल्पही पूर्ण केले आहेत.

डॉ. खर्चे यांना कृषि क्षेत्रातील शेतकरीभिमुख संशोधन प्रकल्प मिळविणे व त्यांची अंमलबजावणी करणे याचा मोठा अनुभव आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.काவि/जन्म/मृत्यु नोंद/४७/२०२५ अकोले दि. ०२/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. लालु कुशाबा गांडाळ, रा. लिंगदेव**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. कुशाबा नारायण गांडाळ यांचा मृत्यू दि. २४/१२/१९८८** रोजी **मौजे लिंगदेव** येथे झाला असुन त्यांच्या मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत लिंगदेव**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. लालु कुशाबा गांडाळ, रा. लिंगदेव**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे **वडील कै. कुशाबा नारायण गांडाळ यांचा मृत्यू दि. २४/१२/१९८८** रोजी **मौजे लिंगदेव** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत लिंगदेव**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०२/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/४६/२०२५ अकोले दि. ०१/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. भास्कर बाळाजी कासार, रा.शेरणखेल**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. अनुसयाबाई बाळाजी कासार यांचा मृत्यू दि. २२/०९/२०२२** रोजी **मौजे शेरणखेल** येथे झाला असुन त्यांच्या मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत शेरणखेल**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. भास्कर बाळाजी कासार, रा.शेरणखेल**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांची **आई कै. अनुसयाबाई बाळाजी कासार यांचा मृत्यू दि. २२/०९/२०२२** रोजी **मौजे शेरणखेल** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत शेरणखेल**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०१/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# बिबट्या जनसंख्या नियंत्रण प्रस्तावास मंजुरी द्या

## खा. नीलेश लंके यांची केंद्राकडे मागणी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

नाशिक मंडलात वाढत चाललेल्या मानवी-बिबट्या संघर्षाच्या धोकादायक परिस्थितीकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे केली. महाराष्ट्र शासनाने वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेल्या बिबट्या जनसंख्या नियंत्रण प्रस्तावाला त्वरित 'मूलतत्त्व मंजुरी' द्यावी, असे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्ह्यासह अनेक भागात जंगल नसतानाही बिबट्यांची वस्ती वाढत असून ऊस शेती, मानवी वस्त्या व बागायती पट्ट्यात बिबट्यांचे वारंवार दर्शन होत आहे. त्यामुळे महिला, मजूर, शेतकरी आणि लहान मुलांवर गंभीर जीविताचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या काही वर्षांत मृत्यू, जखमी होणे आणि पाळीव



जनावरांच्या हल्ल्यांतही मोठी वाढ झाल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षकांच्या अहवालात नमूद आहे. परंपरागत उपाय निष्फळ ठरत असल्याने शासनाने वैज्ञानिक उपाय सुचविले आहेत. नर व मादी बिबट्यांवर सूक्ष्मछेदनाद्वारे कायमस्वरूपी जनन नियंत्रण, तसेच काही मादींवर औषधाधारित गर्भनिरोधकांची चाचणी अशा उपायांचे परीक्षण भारतीय वन्यजीव संस्था करणार आहे.

संघर्षाची गंभीरता लक्षात घेता मंजुरी विलंबित करू नये, तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या कलमानुसार सविस्तर कार्ययोजनेला परवानगी द्यावी, अशी मागणी लंके यांनी केली. नाशिक मंडलातील हा प्रकल्प देशातील मानवी-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनासाठी 'राष्ट्रीय आदर्श प्रकल्प' ठरू शकतो, असे ते म्हणाले.



राजूर : अॅड.एम.एन. देशमुख महाविद्यालय राजुर येथील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय छात्र सेना व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी " जागतिक एड्स दिन "कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी दिली आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेड रिबन क्लब विभागाचे समन्वयक डॉ. आर.आर.सोनवणे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.भाऊसाहेब देशमुख हे उपस्थित होते.याप्रसंगी प्रमुख व्याख्याते डॉ गिरीश नवले यांनी एड्स दिनाचे महत्व, एड्स होण्याची कारणे व उपाय योजना या बद्दल महत्वपूर्ण माहिती दिली.

## थोडक्यात बातम्या...




### जखणगावमध्ये सामुदायिक जागरण गोंधळाचा आगळावेगळा कार्यक्रम!

जखणगाव (स. गांवकरी) : गावाच्या सामाजिक एकोपा व सांस्कृतिक परंपरेला उजाळा देण्यासाठी जखणगावमध्ये सामुदायिक जागरण गोंधळाचा आगळावेगळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. सरपंच डॉ. सुनिल गंधे यांच्या पुढाकाराने आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने हा भव्य सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमात विशेष म्हणून सर्व सहभागी परिवारांना संपूर्ण पाची पोशाख, शालू देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच उपस्थित भाविकांसाठी सर्वांना जेवणाची उत्तम सोय करण्यात आली असून सुमारे १०,००० लोकांची उपस्थिती अपेक्षित आहे. मोठ्या संख्येने भाविक सहभागी होऊन धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक रंगतदार करण्याचे आवाहन सरपंच डॉ. गंधे यांनी केले आहे. गावातील सर्वच घटकांच्या सहभागातून आयोजित हा सामुदायिक जागरण गोंधळ जखणगावची सांस्कृतिक ओळख अधिक दृढ करणारा ठरणार आहे.



### बिबट्याच्या हल्ल्यात ७० वर्षीय महिलेचा मृत्यू

पारनेर (स. गांवकरी) : पारनेर तालुक्यातील किन्ही गावाजवळ मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे ४ वाजता शेतात काम करत असताना बिबट्याच्या हल्ल्यात एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. मयत महिलेचे नाव सौ. भागूबाई विश्वनाथ खोडदे (वय ७०, रा. किन्ही, ता. पारनेर) असे आहे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, भागूबाई या आपल्या शेतात एकट्याच काम करत होत्या. अचानक बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. हल्ल्याची तीव्रता इतकी होती की, त्यांना वाचवण्यासाठी कोणीही पोहोचू शकले नाही आणि जागीच त्यांचा मृत्यू झाला. ग्रामस्थांनी आरडाओरड केल्यावर बिबट्या जंगलाकडे पळाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवचिकित्सेसाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. याप्रकरणी पारनेर पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद झाली. किन्ही परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याच्या हालचाली वाढल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वीही जनावरे मारण्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली असून ग्रामस्थांनी वन विभागाकडे तात्काळ बिबट्या पकडण्याची मागणी केली आहे.



### टाकळी ढोकेश्वर इंदिरा कॉलनी येथे पाणी टंचाई; ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

पारनेर (स. गांवकरी) : पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील इंदिरा कॉलनी येथे गेल्या दोन महिन्यापासून नळाला पाणी न मिळाल्यामुळे तेथील ग्रामस्थ, महिलांनी ग्रामपंचायत कार्यालय येथे हंडा मोर्चा काढून निदर्शने केली आहे. त्यांनी ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांना निवेदन दिले असून लवकरात लवकर खराब झालेल्या पाईपलाईन बदलून दुरुस्त कराव्यात व वस्तीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी तसेच प्रत्येक घराला पाणी द्यावे अशी मागणी या सर्व महिलांनी केली आहे. तसेच या वस्तीमधील लाईटची व्यवस्था देखील ग्रामपंचायत च्या माध्यमातून केली जात नसल्याचे या वस्तीतील ग्रामस्थांचे म्हणणे आहे तरी लाईटची ही व्यवस्था ग्रामपंचायत लवकरात लवकर करावी अशी देखील मागणी या ग्रामस्थांनी केलेली आहे. यावेळी या ठिकाणी संदीप आल्हाट, दीपक साळवे, विकास आल्हाट, सुनील माकरे,देविदास आल्हाट, किरण आल्हाट, चंद्रकांत पाडळे, प्रकाश आल्हाट, दत्तात्रय अल्हाट, योहान गायकवाड, बाळा आल्हाट, यांच्यासह इंदिरा कॉलनी येथील महिला मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित होत्या.

# शहर वाहतूक यांची वाहनधारकांविरूद्ध संयुक्त कार्यवाही; ४५, हजार दंड वसूल

नांदेड : (समर्थ गांवकरी)

पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण व प्रादेशिक परिवहन विभाग नांदेड आणि ईतवारा शहर वाहतूक शाखा पोलीसांनी एकत्रीत कार्यवाही करून ४७ वाहनांची तपासणी केली यावेळी एकुन १२ वाहनावर ४५ हजार रूपये दंड वसूल करून तिन वाहणे जप्त केली आहे .ही कार्यवाही २ डिसेंबर रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या पि.व्ही.आर थेटर समोर नवीन कौठा येथे करण्यात आली, यावेळी तिन्ही विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस अधीक्षक अबिनाश





कुमार, यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या वाहतुक नियम बाह्य वाहण चालविणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. पो.स्टे. नांदेड ग्रामीण हद्दीत बरेच वाहणे कागदपत्रा शिवाय व तसेच अवैध रित्या भरधाव वेगात, फालक्यावर क्षमते पेक्षा जास्त माल भरून चालवुन नियमाचे उल्लंघन करीत असुन त्यामुळे बरेच अपघात होत असल्याने तसेच रॉंग साईड, रॅश ड्रायव्हींग, करीत असल्याचे तक्रारी प्राप्त झाले असल्याने ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी एक तातडीची बैठक घेवुन संयुक्त कार्यवाही करण्याचे ठरवुन आज दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ वाजता च्या दरम्यान पि.व्हि.आर नवीन कौठा समोर रोडवर मोहीम राबवुन एकुन ४७ वाहने तपासुन ,एकुन १२ वाहनावर कार्यवाही करून ४५ हजार रूपये दंड वसूल केला. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सर्व वाहन चालकांना आवाहन केले आहे की कोणीही त्यांच्या ताब्यातील मालवाहु वाहन क्षमतेपेक्षा जास्त माल भरून किंवा फालक्यापेक्षा वर माल भरून वाहतुक करणार नाही कोणीही विना नंबर वाहन चालवणार नाही. किंवा विदाऊट रिप्लेक्टर वाहन चालवणार नाही, गाडीचे कागदपत्रे व लायसन्स सोबत बाळगावे. असे निर्देश देण्यात आले, यावेळी पोलीस स्टेशन चे अमलदार भालेराव, पोहेकॉ/ २२८२ शेख इब्राहीम, पोहेकॉ नितीन मुसळे, पोहेकॉ मुपडे, पोहेकॉ मोरे, पोकॉकवठेकर, पोकॉ मेकलवाड पो.स्टे. नांदेड ग्रामीन पोलीस निरीक्षक, जगन पवार व स्टॉफ शहर वाहतूक शाखा इतवारा,पो.नि गणेश शिंदे,अमीत देऊळकर, पोउपनि, अमर पायघन प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय नांदेड यांनी केलेल्या कामगीरीचे अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक नांदेड यांनी अभिनंदन केले आहे.

# उमेदवारांचे भवितव्य मत पेटीत बंद

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

नांदेड जिल्ह्यात आज मंगळवारी दि २ डिसेंबर रोजी नगरपरिषद आणि एका नगरपंचायतीसाठी मतदान झाले आहे नगराध्यक्ष पदासाठी ७१ तर नगरसेवक पदासाठी ८७३ उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद झाले आहे . मतदानासाठी २९१ मतदान केंद्र स्थापन करण्यात आले होते या निवडणुकीत २ लाख ४५ हजार ४९४ मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावतील मतदानाच्या पहिल्या दोन तासात जवळपास सात ते आठ टक्के मतदान झाले आहे जिल्ह्यात १८ हजार ८०८ मतदारांनी आज सकाळी साडेसात ते साडेनऊ या वेळेत आपला मतदानाचा अधिकार बजावला आहे या निवडणुकीत मतदारांनी निर्भयपणे मतदानासाठी बाहेर पडून आपला मतदानाचा अधिकार बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले होते जिल्ह्यात आज सकाळी साडेसात वाजता २९१ मतदान केंद्रावर मतदानाला सुरुवात झाली होती जिल्ह्यात पहिल्या दोन तासात सर्वाधिक ११ ते १२ टक्के मतदान हे हिमायतनगर नगरपंचायतीसाठी झाले होते येथे २ हजार १७ मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावला आहे देगलूर नगर परिषदेत आठ ते नऊ टक्के बिलोली नऊ ते दहा टक्के कुंडलवाडी आठ साडेआठ टक्के उमरी साडेपाच टक्के मुदखेड सात ते आठ टक्के भोकर सहा ते सात टक्के किनवट पाच ते सहा टक्के हदगाव पाच ते सहा टक्के लोहा सात ते आठ टक्के.

# माळकूप घरफोडी प्रकरणाचा उलगडा; आरोपी जेरबंद

■ तीन साथीदार फरार : ६३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

पारनेर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील माळकूप परिसरात महिलेस धमकी देऊन घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत स्थानिक गुन्हे शाखेने एका सराईत आरोपीला अटक केली आहे. त्याचे तीन साथीदार फरार असून पथकाने आरोपीकडून सुमारे ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. २२ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास हौसाबाई कोंडाजी राहिंज (वय ८०, रा. राहिंजवाडी, माळकूप) आपल्या घरात झोपल्या होत्या.



तब्येत ठीक नसल्याने उठता-बसता न येणाऱ्या हौसाबाई यांना बाहेरुन सुरक्षित ठेवण्यासाठी सुन इंदुबाई यांनी घरास कुलूप लावले होते. याच दरम्यान दोन अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला. झोपेत असलेल्या हौसाबाईंना हाताने दाबून ठेवत धमकी दिली आणि गळ्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. या प्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास करताना एलसीबीच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे नेप्ती नाका परिसरात गणेश रमेश काकडे (वय ३०, रा. पेठ आंबेगाव, ता. मंचर, जि. पुणे) याला ताब्यात घेतले. चौकशीत काकडेने अक्षय उर्फ सोन्या अर्पण भोसले आणि गंड्या अर्पण भोसले (दोघेही रा. घाणेगाव, ता. पारनेर) यांच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली. पथकाने सुमारे ६२ हजार ९५६ रुपयांचा मुद्देमाल काकडेच्या ताब्यातून जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील पथकात सपोनि हरीश भोये, पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश लोंढे, फुरकान शेख, सोमनाथ झांबरे, सागर ससाणे, रोहित येमुल, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, मनोज साखरे, प्रशांत राठोड आणि चालक अरुण मोरे आदींचा समावेश होता. या कारवाईमुळे माळकूप परिसरातील घरफोडी प्रकरणाचा उलगडा झाला असून फरार साथीदारांच्या शोधासाठी पोलिसांची पुढील मोहीम सुरू आहे.

# ठाणे जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी व्यापक मोहीम व योजना

ठाणे : (समर्थ गांवकरी)

ठाणे जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी व्यापक मोहीम व नवीन योजना राबविण्यात येत आहे. जिल्हा बालसंरक्षण विभागाच्या प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या सतर्कतेमुळे हे बालविवाह रोखण्यात यश आले असले तरी बालविवाहाचे हे सर्व प्रकार थांबविण्यासाठी प्रशासनाकडून व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. कल्याण, मुरबाड, शहापूर आणि भिवंडी या भागांमध्ये गेल्या काही महिन्यात बालविवाहाची



प्रकरणे उघड झाली आहेत त्यामुळे 'बालविवाह प्रतिबंधक कायदा', त्यातील तरतुदी, बालविवाह थांबवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया, तातडीची हस्तक्षेप योजना आणि संबंधित विभागांशी समन्वय कसा साधायचा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. अंगणवाडी सेविका आणि इतर ग्रामस्तरीय अधिकारी हे स्थानिक पातळीवर सर्वात प्रथम माहिती मिळवणारे घटक असल्याने त्यांना सजग आणि कार्यक्षम बनविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. मुलींचे वय, त्यांचे शिक्षण, शाळा सोडण्याची कारणे, आर्थिक-सामाजिक परिस्थिती आणि विवाहासंबंधीचे कोणतेही हालचाली या सर्वांवर सतत लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक गावात स्वतंत्र स्वरूपात यंत्रणा तयार करण्यात येत आहे. शाळांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांकडून माहिती गोळा करण्याची प्रक्रिया सुरू असून, ज्या भागांमध्ये शैक्षणिक किंवा आर्थिक अडचणीमुळे मुली लवकर विवाहाच्या जोखमीला सामोऱ्या जातात, त्या ठिकाणी विशेष भेटी घेतल्या जात आहेत. दुर्गम भागातील अल्पवयीन मुलींच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, शिक्षणातील अडचणी समजून घेणे व लवकर विवाहाचे परिणाम हा या मोहिमेत सांगितले जात आहे.

# पारनेर तालुक्यात 'लॅब'ची लूट

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यात काही खासगी पॅथॉलॉजी लॅब चालकांकडून गरीब व गरजू रुग्णांची उघडपणे आर्थिक लूट केली जात असल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास येत आहे. या मनमानी कारभारावर तातडीने प्रशासनाने अंकुश लावावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.गेल्या काही वर्षांत, विशेषतः कोरोना महामारीच्या काळात आरोग्य तपासणी आणि रक्त चाचण्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याचाच फायदा घेत तालुक्यातील काही लॅब धारकांनी आपले खिसे भरण्यास सुरुवात केली आहे. सामान्य रक्त तपासणी असो वा विशिष्ट आजारांची चाचणी, प्रत्येक ठिकाणी रुग्णांना अवाजवी दर मोजावे लागत आहेत. शासकीय आरोग्य केंद्रात चाचण्यांची सोय असली तरी वेळेवर अहवाल न मिळाल्याने किंवा काही विशेष चाचण्यांसाठी रुग्णांना नाइलाजाने खासगी लॅबचा दरवाजा ठोकावा लागतो. याच संधीचा गैरफायदा लॅब चालक घेत आहेत. तालुक्यातील विविध लॅबच्या दरात मोठी तफावत दिसून येते. एकाच चाचणीसाठी दोन वेगवेगळ्या लॅबमध्ये १०० ते ५०० रुपयांपर्यंतचा फरक आढळतो. उदाहरणार्थ, रक्तातील साखरेची तपासणी एका लॅबमध्ये ₹५० ते ₹८० मध्ये केली जाते, तर दुसऱ्या ठिकाणी त्यासाठी ₹१५० ते ₹२०० पर्यंत शुल्क आकारले जात आहे.

# दळवट येथे लोकनेते स्व. ए.टी. पवार (दादासाहेब) यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

## कळवण तालुक्यातील सर्वपक्षीय नेते कार्यकर्त्यांनी जनसेवेच्या परंपरेला केले शतशः नमन

कळवण : (समर्थ गांवकरी)

कळवण तालुक्याचा विकासपुरुष... पाणदेव... समाजाच्या मनात अजूनही अढळपणे उभे असलेले नाव म्हणजे लोकनेते स्व. ए.टी. पवार (दादासाहेब)! त्यांच्या ८८व्या जयंतीनिमित्त दळवट येथील स्मृतीस्थळी आज वातावरणच भावविभोर झाले. जणू त्यांच्या स्मृतींची पावन ऊर्जा पुन्हा एकदा या मातीत फुलून आली.

जुन्या आठवणींना उजाळा माझे दोन्हीकडचे आजोळचे आणि दादासाहेबांचे अतिशय मैत्रीचे संबंध होते दादासाहेबांनी मला आपल्या मुलीप्रमाणेच



जोपासले - डॉ भारती ताई पवार

दादासाहेबांच्या परंपरेशी अखंड निष्ठा जपणारे डॉ. भारती ताई पवार आणि प्रविण पवार यांनी संपूर्ण कुटुंबासह स्मृतीस्थळी उपस्थित राहून पुष्पांजली अर्पित केली. मृदू शब्दात पण अढळ आत्मविश्वासात त्यांनी व्यक्त केलेल्या भावना दळवटच्या दगडामातीला थरारून गेल्या. त्यांच्या डोळ्यांतल्या चमकते श्रद्धेमधून एकच संदेश उमटत होता—

"दादासाहेबांची अपूर्ण स्वप्ने म्हणजे आमची जीवितप्रतिज्ञा!" दादासाहेबांच्या जनसेवेचा विशाल वारसा... त्यांच्या संघर्षाची तेजस्वी गाथा... आणि जनतेसाठी जगण्याचा त्यांचा अटळ संकल्प आजही कळवण तालुक्याच्या प्रत्येक श्वासात जिवंत आहे. गावागावातल्या पायाभूत सुविधांपासून ते सामान्य माणसाच्या हक्कांसाठी लढताना त्यांनी घालून दिलेल्या ठाम भूमिकेमुळेच कळवणच्या विकासाचा पाया मजबूत झाला. आज स्मृतीस्थळी जमलेल्या प्रत्येकाच्या मनात एकच भावना—

दादासाहेब गेले... पण त्यांचा आदर्श आजही जिवंत आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाचा आधार घेऊन प्रविण भाऊ पवार, डॉ. भारती ताई पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले "दादासाहेबांचे अपूर्ण कार्य म्हणजे आमची दिशा; समाजसेवा म्हणजे आमचा धर्म."

कार्यक्रमास प्रविण भाऊ पवार, दीपक खैरनार, दादाजी मोरे, राम चौरे, देशपांडे गुरुजी, प्रविण रौदंळ, अशितोष आहेर, अमोल पगार, हेमंत रावले, संगीता महाले, कनोज ताई, दिनकर आहेर, सुनील (नाना) खैरनार, चेतन निकम, अशोक बोरसे, पांडुरंग गायकवाड, संजय पवार, नवनाथ पवार, यशवंत बागुल, सावित्री ताई, पूनम बागुल, वामन गायकवाड, बाबूराव गायकवाड, गौतम गावित, भरत गायकवाड, धनराज ठाकरे, सुनील गवळी, गणेश पवार, गंगाराम गवळी, रितेश पवार, रविअब्बा आहेरराव यांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.भावनेचा भार, परंपरेचा गौरव आणि जनसेवेचा संकल्प यांचे अद्वितीय मिश्रण असलेला हा सोहळा दळवटच्या इतिहासात सोन्याच्या अक्षरांनी कोरला जाईलच...!

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# भिवंडी तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

- योग्य मोबदला न मिळाल्यास मोठ्या आंदोलनाचा इशारा
- विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीची चेतावणी




**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

पालघर जिल्ह्यातील तारापूर ते पडघा विद्युत उपकेंद्र यादरम्यान उभारण्यात येणाऱ्या खावडा उच्च दाब विद्युत वाहिनीसाठी भिवंडी तालुक्यातील वीस गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र यासाठी समाधानकारक मोबदला न मिळाल्याचा आरोप करत विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीने तीव्र आंदोलनाची चेतावणी दिली आहे. तालुक्यातील या वीस गावांमधून जाणाऱ्या खावडा टॉवर लाईनमुळे शेकडो हेक्टर शेती जमीन बाधित होत असल्याने शेतकरी संतप्त आहेत. शेतकरी कृती समितीने या प्रकल्पाला सातत्याने विरोध दर्शवला असून शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळावा, हा त्यांचा प्रमुख आग्रह आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी व कृती समिती प्रशासनाशी सातत्याने पत्रव्यवहार करत आहेत; मात्र अद्याप समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. उलट खावडा कंपनीकडून वृत्तपत्रांमधून जुने फोटो आणि संदर्भ देत दिशाभूल केल्याचा आरोप समितीने केला आहे. खावडा कंपनीचा अरेरावी पवित्रा कायम राहिला तर शेतकरी कृती समिती प्रकल्पग्रस्तांसह मोठे आंदोलन उभारणार असल्याचे कृती समितीचे मुख्य समन्वयक राजन गावंड आणि भगवान सांबरे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. शेतकरी आणि कृती समितीने वारंवार न्याय मागूनही प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप समितीने केला. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला नाही तर शासन-प्रशासनाला तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल. असा ठाम इशारा प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीने दिला.



ठाणे : दिवा शहरात अल्पवयीन टोळक्याने केलेली तरुणाची हत्या या पार्श्वभूमीवर दिवा शहरातील अवैध गांजा, चरस, दारू, गुटखा, जुगार व्यवसाय व त्यातून वाढलेल्या गुन्हेगारी आणि टोळक्यांमुळे तरुणांमधील व्यसन, हिंसाचार आणि हत्या यावर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्याची समाजसेवक अमोल केंद्रे यांनी मागणी मुंब्रा पोलिसांना केली आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...

### ५१२ आर्मी बेस वर्कशॉप, खडकी येथे ट्रेड्समन पदासाठी मयूर कडूची निवड!



ब्राम्हणवाडा (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील खुंटेवाडी या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबातील मयूर सखाराम कडू याने पुन्हा एकदा गावाचे नाव उज्वल केले आहे. 512 आर्मी बेस वर्कशॉप, खडकी (पुणे) येथे ट्रेड्समन म्हणून त्याची निवड झाली असून, भारतीय लष्करातील रणगाडे व सैनिकी वाहनांच्या निर्मिती-दुरुस्तीच्या महत्वाच्या कामात सहभागी होण्याची संधी त्याला मिळाली आहे. ही निवड मयूरसाठी जशी अभिमानाची आहे तशीच संपूर्ण गावासाठीही गौरवाची बाब ठरली आहे. मयूरचे प्राथमिक शिक्षण झेडपी स्कूल, खुंटेवाडी येथे झाले. पुढे 5वी ते 8वी सह्याद्री विद्यालय, ब्राम्हणवाडा तर 9वी ते 12वीचे शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे पूर्ण केले. शिक्षणासोबतच शिस्त, प्रामाणिकता आणि सेवाभाव या मूल्यांचे संस्कार त्याच्यावर बालपणापासूनच झाले. उच्च शिक्षणासाठी मयूरने अण्णासाहेब मगर कॉलेज, हडपसर येथे प्रवेश घेतला होता. याच काळात राष्ट्रीय छात्रसेना (NCC) मध्ये सक्रिय सहभाग घेतल्याने संघटनशक्ती, आत्मविश्वास आणि देशसेवेची जाणीव अधिक दृढ झाली. त्यानंतर सीरम इन्स्टिट्यूट, पुणे तसेच स्पाइसजेट एअरलाईन्स येथे काम करताना तांत्रिक कौशल्य आणि शिस्तबद्ध काम करण्याचा अमूल्य अनुभव त्याला मिळाला. आर्मी बेस वर्कशॉपमध्ये निवड होणे म्हणजे केवळ नोकरी नव्हे, तर देशसेवेची अनमोल संधी असल्याची भावना मयूरने व्यक्त केली. सैनिकी वाहनांच्या दुरुस्ती व निर्मितीचे काम अत्यंत जबाबदारीचे असल्याने या नव्या भूमिकेत उत्कृष्ट कामगिरी करण्याचा निर्धार त्याने व्यक्त केला. या प्रवासात आई-वडिलांचे कष्ट, गावातील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळा-कॉलेजातील सर्वांच्या प्रोत्साहनामुळेच हे यश प्राप्त झाल्याचे मयूर सांगतो. त्याची निवड ही केवळ व्यक्तीगत यश नसून गावाचा आणि कुटुंबाचा अभिमान आहे. येणाऱ्या काळात अधिक मेहनत, प्रामाणिकता आणि देशसेवेची भावना कायम ठेवून कार्य करण्याचा त्याचा संकल्प असून, गावकऱ्यांनीही त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.




### लंपीग्रस्त पशुपालकांना नुकसानभरपाई द्या : खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी

नवी दिल्ली/पुणे (स. गांवकरी) : पुण्यासह महाराष्ट्रात लंपी त्वचा रोगाचा (एलएसडी) प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असून, पशुपालकांना गंभीर आर्थिक फटका बसला आहे. लंपीग्रस्तांना नुकसान भरपाई द्यावी, तसेच लंपीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत लक्षवेधीद्वारे केली. आपल्या लक्षवेधीमध्ये प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत सुमारे ९८ हजार २३० गायी-म्हशी संक्रमित झाल्या असून, त्यापैकी अनेक जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या रोगामुळे दुग्ध उत्पादनात घट झाली असून, हजारो पशुपालकांची आर्थिक बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे." सरकारकडून लसीकरण मोहीम राबवली जात असली, तरी ग्रामीण भागात आरोग्य पायाभूत सुविधा, औषध पुरवठा आणि पशुवैद्यकीय सेवांची कमतरता असल्याने पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. तसेच पुण्यातील इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटर्नरी बायोलॉजिकल प्रॉडक्ट्सला (IVBP) देशी लसींच्या उत्पादनासाठी केंद्राकडून तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य द्यावे, जेणेकरून राज्य लसीच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होईल, असेही त्यांनी नमूद केले.

### मंचर नगरपंचायत निवडणुकीत तब्बल ७४,७७ टक्के मतदान

मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार दि.२ रोजी झालेल्या मतदानात तब्बल ७४,७७टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली. सकाळच्या सत्राला थंड वातावरण असल्याने सुरुवातीला मतदानाचा वेग मंद होता.अनेक मतदान केंद्रांवर पहिले दोन–अडीच तास संमिश्र प्रतिसाद मिळाला. सकाळी दहा वाजल्यानंतर वातावरण उबदार होताच मतदारांनी मतदान केंद्राकडे मोठ्या संख्येने धाव घेतली.दुपारी दोन वाजेपर्यंत पुन्हा थोडी मंदी आल्याचे दिसले. मात्र सव्वा तीननंतर मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा झपाट्याने वाढल्या.काही केंद्रांवर महिलांचीही विशेष गर्दी दिसून आली.संपूर्ण दिवसभर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस व निवडणूक कर्मचाऱ्यांकडून काटेकोर बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सर्व मतदान केंद्रांवर प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडली.मतदानानंतर माहिती देताना सहाय्यक निवडणूक अधिकारी गोविंद जाधव म्हणाले,"मंचर शहरातील मतदारांनी लोकशाहीचे भान ठेवून मोठ्या उत्साहात मतदान केले.संपूर्ण प्रक्रिया शांततेत पूर्ण झाल्याचा आम्हाला आनंद आहे."उत्साहपूर्ण मतदानामुळे रविवार दि.२१ रोजी होणाऱ्या मतमोजणीबाबत सर्व पक्ष, उमेदवार आणि समर्थकांमध्ये उत्सुकता अधिकच वाढली आहे. मंचर-मोरडेवाडी येथील वैभव बबनराव मोरडे यांचा विवाह झाला.त्यानिमित्ताने सत्यनारायण महापूजा आणि इतर धार्मिक कार्यक्रम मंगळवार दि.२ रोजी होते.

# 'आयआयएम बंगळुरू'चे इन्क्युबेशन 'समावेश' कडून पूर्ण




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील विद्यार्थी व स्थलांतरीत युवकांसाठी कार्यरत 'समावेश' संस्थेने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) बंगळुरूच्या 'एनएसआरसेल' मार्फत वर्षभराचे इन्क्युबेशन यशस्वीपणे पूर्ण केले हे. हा एक मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम असून, यामध्ये संस्थेची क्षमता-वृद्धी, संघटनात्मक विकास आणि परिणामाधारित फ्रेमवर्क विकसित करण्यावर भर दिला गेला. त्यातून संस्थेच्या कार्याची व्याप्ती आणि प्रभाव अधिक परिणामकारक होणार आहे.

कागदपत्रांची पूर्तता, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षणातील प्रवेश या तीन मुद्द्यांवर 'समावेश' संस्थेचे काम केंद्रित आहे. गेल्या वर्षभरात (२०२४–२५) ११३० हून अधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे शैक्षणिक मार्गदर्शन, २५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, ५०० पेक्षा अधिक तरुणांना आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेसाठी सहाय्य केले आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठांत शिष्यवृत्तीवर जाण्यासाठी मार्गदर्शन केले गेले. याची दखल घेत आयआयएम बंगळुरूच्या 'एनएसआरसेल' च्या इन्क्युबेशनसाठी 'समावेश' ची निवड केली गेली.

याबाबत बोलताना 'समावेश' चे संस्थापक ॲड. प्रविण निकम यांनी सांगितले की, सामाजिक प्रश्नांवर काम करणाऱ्या 'समावेश' ला या उपक्रमामुळे अधिक बळकटी मिळाली आहे. 'आयआयएम' ने आम्हाला १२ महिन्यांसाठी मार्गदर्शन केले. संस्थेचे फ्रेमवर्क, उपक्रमाची बांधणी, संस्थेच्या कामाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने करावयाच्या गोष्टी याविषयी शिकता आले.

मूलभूत विषयांवर काम करणाऱ्या आठ संस्थांची या इन्क्युबेशनसाठी निवड करण्यात आली होती. त्यात 'समावेश' चा समावेश होता. या संस्थेचे सहाय्य आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा निश्चितच 'समावेश' ला होईल. अधिक सजगतेने आणि जागरूकतेने काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

'समावेश' विषयी बोलताना ॲड. प्रविण निकम म्हणाले, "२०११ मध्ये पुण्यात ग्रामीण भागातून शिक्षणासाठी स्थलांतर झालेल्या काही तरुण युवकांनी ग्रामीण भागातील युवकांच्या उच्च शिक्षणातील समस्या जाणून सुरू केलेला हा सामाजिक उपक्रम आहे. उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करताना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. विविध संधी, त्यासाठी असणाऱ्या विविध प्रवेश परीक्षा किंवा मग विविध करिअरच्या वाटा निवडत असताना साह्यभूत असणाऱ्या शिष्यवृत्त्या आणि त्यासाठी लागणारी महत्वाची कागदपत्रे याविषयी स्थलांतरित युवकांना पुरेशी माहिती नसते. त्यामुळे त्यांना चांगल्या विद्यापीठांमध्ये शिकता येत नाही. या अशा सर्व प्रश्नांवर उपाय म्हणून 'समावेश' कडून तीन वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत काम केले जाते.

## राज्यातील सर्व शाळा ५ डिसेंबरला राहणार बंद

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील सर्व शाळा ५ डिसेंबरला बंद राहणार आहेत. महाराष्ट्रातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. हे आंदोलन मुख्यतः शिक्षक पात्रता परीक्षा (TET) सक्ती, संच मान्यता (staffing approval) संदर्भातील शासन निर्णय रद्द करण्यासाठी आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी आहे. शिक्षक संघटनेची मागणी अशी आहे की, २०१३ पुर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य करणे बंद करावे. आणि १५ मार्च २०२४ चा संचमान्यता निर्णय रद्द करून जुने निकष लागू करावे. शिक्षणसेवक योजनेतील बदल रद्द करून सर्व शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी लागू करावी. या आंदोलनामुळे राज्यातील शाळा बंद राहणार आहे. राज्यव्यापी शाळा बंदचा पुण्यातून एल्गार करण्यात आला आहे. मुख्याध्यापक महामंडळाने राज्यव्यापी संपाचा इशारा दिला आहे. पुण्यात आज पार पडलेल्या बैठकीत मुख्याध्यापक महामंडळाने निर्णय घेतला आहे. येत्या ५ डिसेंबर रोजी राज्यातील शाळा बंद ठेवून सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

## युवतीच्या पोटात साडेतीन किलोची गाठ; डॉ. धांडे यांनी केली शस्त्रक्रिया

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**




धांडे मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल आळेफाटा (ता.जुन्नर) येथे प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर राजेंद्र धांडे यांना १७ वर्षाच्या युवतीच्या पोटात साडेतीन किलोची अर्धवट फुटलेली गाठ काढण्याची अवघड शस्त्रक्रिया यशस्वी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की शनिवार दि.२७ रोजी सतत पोटात दुखणे, पोट फुगणे अशा समस्यांनी ग्रस्त असलेली भोरवाडी (ता.जुन्नर) येथील युवती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आली.सदर युवतीची सोनोग्राफी केली असता तिच्या पोटामध्ये गाठ असल्याचं निदर्शनास आलं. डॉक्टरांनी नातेवाईकांना ऍडमिट करून ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. शनिवार दिनांक २८ रोजी युवतीच अत्याधुनिक पद्धतीने दुर्बिणीद्वारे ऑपरेशन करण्यात आलं. पोटामध्ये अर्धवट फुटलेली गाठ होती व बाजूला रक्तस्त्रावही झाला होता. ऑपरेशन यशस्वीरित्या झाले असून युवतीचे अंडाशय वाचवण्यात डॉक्टरांना यश आले आहे. त्यामुळे भविष्यात ती युवती गर्भधारणा ही करू शकते. सदर युवतीची गाठ काढण्याची अवघड शस्त्रक्रिया डॉक्टर राजेंद्र धांडे यांनी अवघ्या काही वेळात पूर्ण केली. ऑपरेशन नंतर काही तासांतच युवती उठून व्यवस्थित चालायला लागली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी युवतीला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. पोटातील गाठीला पुढील तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहे.

रुग्णाला अशक्य वाटणारी शस्त्रक्रिया डॉक्टरांनी यशस्वी केल्यामुळे पेशंटच्या नातेवाईकांनी व रुग्णाने डॉक्टर धांडे यांचे हृदयस्पर्शी आभार मानले. डॉ. राजेंद्र धांडे हे प्रचंड अनुभवी प्रसिद्ध स्त्री रोग व प्रसूती तज्ञ असून काही वेळातच पेशंटचा त्रास कमी करून अवघड व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण करतात.

त्यांनी आजपर्यंत हजारो शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. यामध्ये अवघड प्रसूती, लॅप्रोस्कोपी, अत्याधुनिक दुर्बिणीतून पोटाच्या गाठीच्या शस्त्रक्रिया,अंडाशय व गर्भाशयाच्या गाठीच्या शस्त्रक्रिया, गर्भपिशवीचे कॅन्सर व छातीतील गाठीचे ऑपरेशन, व्यंधत्व चिकित्सा,

अपेंडिक्स, हर्निया, हायड्रोसिल, थायरॉईडचे ऑपरेशन, अशांचा समावेश आहे. त्यामुळे अवघड व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया साठी राज्यभरातील रुग्ण उपचारासाठी येत असतात.

## 'अभय प्रभावना'तील 'क्रीडांगणा'चे लोकार्पण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



'अभय प्रभावना म्युझियम अँड नॉलेज सेंटर' ने उभारलेल्या 'क्रीडांगण' या खास लहान मुलांसाठी तयार केलेल्या खेळ आणि शोध अनुभव केंद्राचे उद्घाटन रविवारी (३० नोव्हेंबर) माजी टेनिसपटू, अर्जुन पुरस्कार विजेते गौरव नाटेकर यांच्या हस्ते झाले. नाटेकर यांच्या उपस्थितीमुळे लहान मुलांची सर्जनशीलता आणि आनंददायी अनुभव वाढविण्याच्या उद्देशाने उभारलेल्या या केंद्राला विशेष प्रेरणा मिळाली. उद्घाटनाच्या कार्यक्रमात सुमारे १०० मुलांनी पॉपकॉर्न, कँडी फ्लॉस आणि विविध आकर्षक उपक्रमांचा आनंद घेतला. त्यामुळे उपस्थित राहिलेल्या अनेक कुटुंबांसाठी हा सोहळा अधिक रंगतदार आणि उत्साहवर्धक ठरला. सुमारे पंधरा हजार चौरस फूट(१३९४ चौ.मी.) क्षेत्रफळावरील या जागेवर मुलांसाठी अत्यंत विचारपूर्वक तीन मुख्य विभागांची उभारणी करण्यात आली आहे. यामध्ये उच्च-गुणवत्तेच्या स्लाइड, झोके, क्लायंबिंग स्ट्रक्चर आणि मुलांच्या हालचालींना प्रोत्साहन देणाऱ्या खेळांसह विशेष खेळ विभागाचाही समावेश आहे. याशिवाय येथे १०० ते १५० आसनक्षमतेचे खुल्या हवेतील ॲम्फीथिएटरही असून, तेथे गोष्टी, संगीताचे कार्यक्रम, जादूचे शो, नृत्य कार्यशाळा; तसेच अभिव्यक्ती आणि आत्मविश्वास वाढविणाऱ्या सामूहिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

याशिवाय येथे झोपडी शैलीत उभारलेल्या 'क्रिएटिव्ह स्पेसेस' चा समावेश असून, तेथे चित्रकला, मातीशिल्प, शिल्पनिर्मिती, हस्तकलांच्या कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

## चिकणी विद्यालयाचे सुयश

### अक्षया उगले प्रथम

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

तळेगाव दिघे (ता. संगमनेर) येथे पंचायत समिती संगमनेर व संगमनेर तालुका विज्ञान–गणित अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संगमनेर तालुका विज्ञान–गणित प्रदर्शन सन 2025-26 नुकतेच उत्साहात पार पडले. शिक्षण महर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय येथे 27 नोव्हेंबर ते 29 नोव्हेंबर 2025 दरम्यान हा भव्य शैक्षणिक उपक्रम झाला. या प्रदर्शनात श्री भारतीबाबा विद्यालय, चिकणी (ता. संगमनेर) येथील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम ठेवत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थी वर्गातील यश: माध्यमिक इयत्ता नववी ते बारावी गणित गटात प्रथम क्रमांक – कुमारी उगले अक्षया संतोष, अक्षयाने गणित विषयातील सादरीकरणातून आपल्या सर्जनशीलतेची आणि बुद्धिमत्तेची प्रभावी छाप उमटवली. तिच्या या गुणांची सर्वस्तरातून प्रशंसा होत आहे.

# 'आदर संविधानाचा जागर' कीर्तन सोहळा उत्साहात संपन्न

## अध्यात्म, धर्म आणि संविधान मूल्यांचा सुंदर संगम कीर्तनातून उलगडला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



संविधान दिनाचे औचित्य साधत रविवारी सिद्धार्थ नगर, बावधन बुद्रुक येथे 'आदर संविधानाचा जागर' कीर्तन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. विकास प्रतिष्ठान, सुजाता महिला मंडळाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला ग्रामस्थांसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने आणि भारतीय संविधानाच्या प्रतीचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर सामूहिकरीत्या संविधानाची प्रास्ताविका वाचन करून लोकशाही मूल्यांप्रती दृढ निष्ठा व्यक्त करण्यात आली.

विकास प्रतिष्ठानचे संस्थापक आणि रिपब्लिकन पक्ष, महाराष्ट्र प्रदेश युक्क आघाडीचे संघटक उमेश कांबळे यांनी स्वागतपर भाषणात सामाजिक कार्याची दिशा मांडली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण मोहीम, तसेच महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीचे आयोजन हे उपक्रम ग्रामस्थांच्या सहकार्यातून यशस्वी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी संविधानाच्या अस्मितेवर, जागर संस्कृतीवर तसेच नागरिकांच्या कर्तव्यांवर मनोगत व्यक्त केले. यामध्ये शिक्षणसम्राट राजेंद्र बांदल, पोलीस पाटील बबनराव दगडे, माजी नगरसेवक दिलीप अण्णा वेडे पाटील, रिपब्लिकन पक्षाचे संघटन सचिव परशुराम वाडेकर आणि मा. सभागृह नेते पुणे मनपा बंडू केमसे यांचा समावेश होता.

सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांतर्गत नामदेवराव मोरे माध्यमिक विद्यालय, बावधन येथील २०० विद्यार्थ्यांना विकास प्रतिष्ठानतर्फे शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यानिमित्त उपस्थित मान्यवरांचा शाल, संविधानाची प्रत आणि 'संविधान ट्रॉफी' देऊन सत्कार करण्यात आला. राजेंद्र बांदल, परशुराम वाडेकर, भरत मारणे, विजय दगडे पाटील, किरण दगडे पाटील, निखिल बांदल,कुटुंबीय यांसह, महाराष्ट्र शासन कीर्तन पुरस्कारप्राप्त राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचा विशेष गौरव करण्यात आला. महाराजांनी संविधान विषयावरील प्रभावी कीर्तन सादर करून उपस्थितांचे मनोवेधन केले.

# पुनर्विकासासाठी म्हाडा 'सक्षम' का हवे?

अलीकडे 'म्हाडा' ला उपकर प्राप्त इमारतींच्या संदर्भात सक्षम प्राधिकरण म्हणून नियुक्त करावे, अशी मागणी जोर धरत आहे. जावेद अब्दुल रहमान अत्तर विरुद्ध म्हाडा प्रकरणात उच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे ज्याचा परिणाम उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासावर होऊ शकतो. यामुळे 'म्हाडा' ला सक्षम प्राधिकरण नियुक्त करण्याची मागणी केली जात आहे. उच्च न्यायालयाने हा निकाल जून २०२५ मध्ये दिला. याची पार्श्वभूमी प्रथम समजून घ्यावी लागेल. उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया बरीच गुंतागुंतीची असते, त्यात जमीनमालकांचे अधिकार, भाडेकरूचे अधिकार, म्हाडा, मुंबई पालिका इत्यादी प्राधिकरणातील निर्णय प्रक्रिया यामुळे बराच कालावधी लागतो. ही प्रक्रिया गतिमान व्हावी, याकरिता शासनाने डिसेंबर २०२२ मध्ये कलम ७१-अ अन्वये म्हाडा कायद्यात दुरुस्ती केली, उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाकरिता कालबद्ध कार्यक्रमाची तरतूद यात करण्यात आली आहे. या सुधारित कायद्यानुसार म्हाडाच्या अनेक कार्यकारी अभियंत्यांनी १३५ प्रकरणात घेतलेले निर्णय व काढलेल्या नोटिसांवरील निकालात न्यायालयाने म्हाडाला निरस्त व स्थितीत ठेवायला भाग पाडले आहे. याशिवाय या सर्व प्रकरणात दोन निवृत्त न्यायमूर्तींची एक समिती नेमली असून या सर्व प्रकरणातील कागदपत्रांची छाननी करावी, असे देखील आदेश दिले आहेत.



## संपादकीय

कलम ७१-अ च्या तरतुदी नुसार महापालिका किंवा म्हाडाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी एखादी उपकर प्राप्त इमारत राहण्यास धोकादायक ठरविली व तशी नोटीस काढली तर त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत मालकानी भाडेकरूंपैकी किमान ५१% सहमती प्राप्त करून पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केला पाहिजे, तसे न केल्यास पुढील सहा महिन्यांच्या आत भाडेकरू ५१% सहमतीसह पुनर्विकासाचा प्रस्ताव देऊ शकतात. भाडेकरू देखील प्रस्ताव सादर करण्यास सहा महिन्यांत अपयशी ठरले तर म्हाडा हा पुनर्विकास आपल्या हाती घेऊन एखादी एजन्सी लावून करून घेऊ शकते. यात भूमालकाला मोबदला देण्यात येईल, अशी देखील तरतूद आहे. या तरतुदीवरून असे दिसते




की, म्हाडाने एकदा नोटीस दिली की, इमारत धोकादायक आहे, की मग मालक, भाडेकरू सगळ्यांची लगबग सुरू होते. त्यात प्रसंगी भूमालकाचे विकासाचे हक्क हिरावले जाऊ शकतात. जर सहा महिन्यांत आवश्यक ती पूर्तता केली नाही तर आणि नंतर भाडेकरूंचे देखील पुनर्विकासाचे हक्क हिरावून घेतले जाऊ शकतात. जर भाडेकरू प्रस्ताव सादर करू शकले नाही तर आणि शेवटी म्हाडा नेमेल तो विकासक आणि त्यातून मिळेल ते पुनर्वसन अशी स्थिती होती. या कलम ७१-अ संदर्भात कायद्याच्या तरतुदीमध्ये एक उणीव राहून गेली, ज्यामुळे ९३५ प्रकरणांत पुढील प्रक्रिया क थांबली आहे. ती म्हणजे सक्षम प्राधिकारी कोण हे परिभाषित केलेले नाही. कलम ७१-अ मध्ये म्हटले आहे की म्हाडाचा सक्षम प्राधिकारी एखादी इमारत धोकादायक असल्याचे ठरवून नोटीस काढू शकतो, म्हाडा कायद्यात सक्षम अधिकारी जो परिभाषित केला आहे तो एखादा उपजिल्हाधिकारी किंवा घे न्यायाधीश असू शकतो. मात्र, म्हाडाने प्र कार्यकारी अभियंत्यांमार्फत १३५ नोटिसा के काढल्या, जे कायदेशीर नसल्याचे दिसते. प्र मात्र, म्हाडा कायद्यानुसार सक्षम अ प्राधिकारी हे अनधिकृत कब्जा ठेवणाऱ्यांना निष्कासित करण्यासाठी घे नेमलेले आहेत. त्यांच्याकडे एखादी इमारत जीर्ण झाली आहे, धोकादायक आहे किंवा नाही हे ठरवण्यासाठी तांत्रिक ज्ञान नाही, ते ज्ञान अभियंत्याकडेच उपलब्ध आहे; परंतु अभियंत्यांना गॅझेट काढून सक्षम प्राधिकारी घोषित केलेले नाही.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 4 | | 5 | 9 | | 1 | |
| | 2 | | 1 | | | 7 | 5 | 9 |
| | | | | | | 6 | | |
| | | | 4 | | | | 7 | 6 |
| | 4 | 3 | | 2 | | 5 | 9 | |
| 5 | 1 | | | | 6 | | | |
| | | 8 | | | | | | |
| 1 | 7 | 9 | | | 2 | | 8 | |
| | 6 | | 7 | 8 | | 9 | 3 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 2 | 1 | 4 | 3 | 9 | 7 | 5 |
| 5 | 9 | 4 | 7 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |
| 7 | 3 | 1 | 6 | 9 | 5 | 2 | 4 | 8 |
| 9 | 4 | 6 | 3 | 5 | 8 | 1 | 2 | 7 |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| 8 | 1 | 5 | 2 | 7 | 9 | 3 | 6 | 4 |
| 3 | 2 | 7 | 5 | 1 | 4 | 8 | 9 | 6 |
| 4 | 5 | 9 | 8 | 3 | 6 | 7 | 1 | 2 |
| 1 | 6 | 8 | 9 | 2 | 7 | 4 | 5 | 3 |

### पंचांग

| | | |
|---|---|---|
| पंचांग | संवत्सर - विश्वावसूनाम | १२:२६:१० |
| ३डिसेंबर२०२५ | अयन- दक्षिणायान | नक्षत्र:भरणी १७:५९:४५ |
| बुधवार | मास- मार्गशीर्ष | योग:परिध १६:५६:५८ |
| विक्रम संवत्- २०८२ | ऋतु- सौर हेमंत | करण:तैतिल १२:२६:१० |
| मार्गशीर्ष शके | शुक्ल पक्ष | करण:गर २२:३३:२८ |
| संवत्- १९४७ | तिथि:त्रयोदशी | सूर्य:वृश्चिक |

## उपदेशाचे डोस

### उशिरा येण्याची शिक्षा

महात्मा गांधी नियमांचे पालन अतिशय काटकोरपणे करत असत. ते प्रत्येक नियम मोठ्या विचारपूर्वक तयार करत असत. स्वत: ही काटेकारपणे पालन करीत. त्यांच्या आश्रमात जेवणासाठी हजर राहण्यासाठी दोन वेळा घंटा वाजवून सूचना देण्यात येत असे. जो दुसऱ्या घंटेनंतर येत असे त्याला दुसऱ्या पंक्तीत बाहेर उभे राहावे लागत असे. अगदी त्या पंक्तीत जागा रिकामी असली तरी ! गांधीजी त्यास उशिरा येण्याची गोड शिक्षा संबोधत असत. दुसऱ्या घंटेनंतर नियमाप्रमाणे भोजनगृहाचे दरवाजे बंद केले जात असत. मग कोणालाही आत प्रवेश नसे. एकदा स्वत: गांधीजींना उशीर झाला. दरवाजा बंद करणारे आश्रमवासी गांधीजींना येताना पाहून घुटमळले. तेवढ्यात महादेव भाईंनी त्यांना सांगितले, काय आपल्याला बापूजींकडून शिक्षा घ्यायचीय का ? लवकर दरवाजा बंद करा . नियमाप्रमाणे गांधीजीं व्हरांड्यात उभे राहिले.

नियमांचे पालन होत आहे हे पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्याचवेळी तेथे हरिभाऊ उपाध्याय आले व बापूजींना उभे पाहून म्हणाले, बापूजी, आज आपणही गुन्हेगारांच्या रांगेत आलात ? जेवणास उशिरा आल्यामुळे ही गोड शिक्षा तुम्हालाही भोगावी लागत आहे.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८१८ – इलिनॉय अमेरिकेचे २१वे राज्य झाले.
- १९७१ – पाकिस्तानने भारतावर हल्ला केला.
- २००७ – ऑस्ट्रेलियात लेबर पक्षाचे नेते केविन रुड यांनी पंतप्रधान पदाची शपथ ग्रहण केली.

### राष्ट्रीय

- १९८४ – भोपाळमध्ये वायुगळतीमुळे ३,८०० हून अधिक लोक ठार, लाखो जखमी.
- २००६ – गुजरातमध्ये नवसारी-बारदोली मार्गावरील पार्दी आणि नवगामच्या मध्ये एक लहान ट्रक उलटल्याने त्यामधील १५ कामगारांचा मृत्यू झाला.


### जन्म

- १३६८ – चार्ल्स सहावा, फ्रांसचा राजा.
- १८५४ – विल्यम मिल्टन, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.
- १८८४ – डॉ. राजेंद्र प्रसाद, स्वतंत्र भारताचे प्रथम राष्ट्रपती.
- १८८४ – टिब्बी कॉटर, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८९९ – इकेदा हयातो, जपानी पंतप्रधान.
- १९०५ – लेस एम्स, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९२३ – ट्रेव्हर बेली, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९२५ – केन फन्स्टन, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ११५४ – अनास्तासियस चौथा.
- १७६५ – लॉर्ड जॉन फिलिप सॅकव्हिल, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९१२ – प्रुदेन्ते होजे दि मोरे बारोस, ब्राझिलचे राष्ट्राध्यक्ष.
- १९७२ – 'हॉकीचा जादूगर' मेजर ध्यानचंद, प्रसिद्ध भारतीय हॉकीपटू.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५३



**आडवे शब्द**

१. '... दादा मला एक वहिनी अण'
१०. विशेष
१२. रात्रीचा पाऊस
१३. उमर
१४. वस्त्र, कापड
१६. शेतकरी
१७. युवती
१८. बरगडी
१९. घट्ट
२१. घरातील वरचा भाग
२२. कारभार, नस्ता उद्योग!
२३. गाय
२४. गोष्टीतील वनमानव (इंग्रेजी)
२६. दगड, लाकूड यांचा पातळ कापडी पट्टी
४९. घटस्फोट
५१. रोखलेली नजर
५२. मलई
५३. तफावत, अंतर
५५. पारंब्याचा एक वृक्ष
५६. शुल्क
५७. जेमतेम
५९. आश्चर्य
६१. लज्जास्पद
६२. अभिनेता
६३. हयगय, दुर्लक्ष
६४. नंतर
६५. च्या बरोबर
६७. भीमाजवळचे शास्त्र
६८. एक कालवण
६९. सहाय्यक
७१. मरणारा, प्रतिस्पर्धी
७२. महाभारतातील वास्तुशास्त्रज्ञ
७३. आपला नसलेला
७४. राजवाड्यातील दालन
७५. सोंग वठवणारा
७६. पद्धतीप्रमाणे
७७. बांबू
२७. जनावर, माणूस इ.
२८. पोशाख (अनेक वचन)
३०. वृद्धत्व, म्हतारपण
३१. जोराचा रट्टा
३२. पादत्राण
३४. पिशाच, वेडा मनुष्य
३६. बारीक झिणझिण
३८. अपऱ्या नाकाचा
४०. अविवेकी, अतिरेकी कृत्य
४१. दिखाऊ, वरवर
४२. पुरुष
४३. पाणी उकळण्याचा आवाज
४६. शिष्य
४८. बाजेची

**उभे शब्द**

१. गौर वर्णाचा
२. पद्धत
३. पणजीचे राज्य
४. पर्जन्यकाळ
५. डोळे
६. अत्यंत किंमतीची, मौल्यवान
७. पाताळ
८. सौन्याच्या मुक्कामाची जागा
९. शीर, धमनी
११. सर्वत्र, चोहीकडे
१५. फायदा, तोटा
१६. कमीत कमी
१९. भांडण
२०. गरजू
२२. मेहरबानी
२५. पाण्याचा उगम
२६. केस
२७. जीव
२९. झटकम
३२. जुजबी
३३. अधाशी, लालची
३५. चालत चालत
३७. चुनखडीचा दगड
३९. वात्रट, चावट
४३. जाडसर पीठ
४४. शेंगेवरील साल
४५. शेवट, अखेर
४६. कैद
४७. हानी, तोटा करणारे
४८. नेत्रकटाक्ष
५०. कट्टर
५४. भांडण, खोडी
५८. केसांची लट
६०. माराची उमटलेली खूण
६३. नाविक दल
६४. कैफी, नशा आणणारे
६५. फटाक्याची माळ
६६. उगीच
६७. जाणे, प्रस्थान करणे
६९. जळलेला, करपलेला भाग
७०. युद्ध
७१. धनी
७३. पान

### शब्दकोडे क्र. ५२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.बुगडी माझी सांडली ग जाता साताऱ्याला १०.गार ११.जस्त १२.मस १४.संगम १६.सडा १७.पाव १८.दादा १९.सनई २१.वाटचाल २२.शरद २३.समजदार २६.गवत २८.नर ३०.दंग ३१.मजा ३३.वट ३६.मकर ३८.सावड ४०.जनगणमन ४३.महिना ४५.भेदक ४७.खातमा ४८.उदर ४९.सर ५०.मुलगा-मुलगी ५२.लगदा ५३.वाटप ५५.दरड ५७.जावक ५८.रजनीकर ६१.बाग ६३.पारधी ६५.डमरु ६६.रणरण ६७.कवी ६८.तजवीज ७०.मज ७१.तर ७२.रीत ७३.कौरव ७४.तवंग ७६.वाकडा ७७.सखा ८०.तरुणाई ८१.भाग्य ८२.रुप ८३.सवलत ८४.टवटवीत

उभे उत्तर : २.गवगवा ३.माग ४.सांगाडा ५.डर ६.गजवदन ७.जास्त ८.साम दाम दंड भेद ९.तास १३.ताई १५.मटकी १६.सलग १७.पार १८.दास १९.सदा २०.नरम २२.शतक २४.जग २५.सावज २७.वमन २९.रसना ३२.जादूगार ३४.टन ३५.पण ३७.रमत ३९.भोक ४१.गजगामिनी ४२.उदाहरण ४९.सपक ५०.मुजोर ५१.गीर ५४.टवटवी ५६.डबा ५९.जरतर ६०.कडवी ६२.गरजवंत ६३.पारखी ६४.परत ६७.करडा ६९.जवस ७०.मत ७१.तक ७२.रीतभात ७३.कौलारू ७५.गरुड ७६.वाईट ७८.खास ७९.पाल

# मतमोजणी पुढे ढकलली; निवडणूक तयारीवर 'पाणी'

मंचर : (समर्थ गांवकरी)

मंचर नगरपंचायतीसह राज्यातील विविध नगरपंचायत–नगरपरिषद निवडणुकांची मतमोजणी बुधवार दि. ३ रोजी होणार असल्याने निवडणूक आयोग आणि प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली होती.मतमोजणी कक्ष, मतपेट्यांसाठी स्ट्रॉंग रूम, पुरेसा पोलीस बंदोबस्त, सावलीसाठी मंडप, पाणी–स्वच्छता सुविधा अशा सर्व व्यवस्थांवर लाखो रुपयांचा खर्चही करण्यात आला होता.मतमोजणी पुढे ढकलल्याने निवडणूक तयारीवर अक्षरश: 'पाणी' पडले.




उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून मतमोजणी रविवार दि. २१ रोजी घेण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिल्याने संपूर्ण तयारीवर अक्षरशः पाणी पडले.राज्यात शनिवार दि. २० रोजी काही नगरपंचायतींना मतदान होणार असून त्यानंतरचे निकाल हे पुढील निवडणुकांवर परिणाम करू शकतात, या कारणास्तव काही राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी न्यायालयात मतमोजणी पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

न्यायालयाने ही मागणी मान्य करताच निवडणूक आयोगाची बुधवार दि.३ रोजीच्या मतमोजणीची सर्व तयारी निरर्थक ठरली. मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी, पोलीस बंदोबस्त, तांत्रिक यंत्रणा आणि साहित्य या सर्वांचे पुनरनियोजन आता करावे लागणार आहे.मतमोजणीला काहीच तास उरले असताना दिलेल्या न्यायालयीन आदेशामुळे प्रशासनात अचानक गोंधळ निर्माण झाला असून आता मतमोजणी रविवार दि.२१ रोजी पार पडणार असल्याची अधिकृत माहिती देण्यात आली आहे.



रणद बुद्रुक (ता. अकोले) : ए.एस.के. फाऊंडेशन, मुंबई पुरस्कृत आणि बायफ (BISLD), नाशिक संचलित समृद्ध किसान प्रकल्पा अंतर्गत रणद बुद्रुक येथे ग्राहक सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमास ए.एस.के. फाऊंडेशनचे मॅनेजर श्री. अरुण बांबळे, बायफचे श्री. राम कोतवाल, श्री. विष्णु चोखंडे, श्री. निलेश आलवणे, गावचे सरपंच श्री. सुंदरलाल भोईर तसेच मोठादेव ग्रामविकास समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### १६ राज्यांतील १७८ Gen Z स्पर्धक चिन्मया गीताचांति राष्ट्रीय अंतिम फेरीत

पुणे (स. गांवकरी) : चिन्मया मिशनचे जागतिक मार्गदर्शक स्वामी स्वरूपानंद यांच्या उपस्थितीत भारतातील १६ राज्यांतील १७८ राज्यस्तरीय विजेते २९–३० नोव्हेंबर रोजी चिन्मया विभूती (पुणे) येथे राष्ट्रीय गीताचांति स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी एकत्र आले. पुढील वर्षी होणाऱ्या चिन्मया अमृत महोत्सवाचा हा एक प्रमुख उपक्रम आहे. १९८० च्या दशकात स्वामी चिन्मयानंदांनी सुरू केलेल्या या उपक्रमाचा उद्देश "चँट–स्टडी–नो–लिव्ह" या तत्त्वावर आधारित गीतेचा संदेश मुलांपर्यंत पोहोचवणे हा आहे. यंदा १६ राज्यांतील २,५०० शाळांमधील ३ लाख विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. ६ गटांत घेण्यात आलेल्या स्पर्धेत दिव्यांग मुलांचाही समावेश होता. परीक्षक म्हणून चिन्मया मिशनचे स्वामी व ब्रह्मचारिणी सहभागी झाले. अंतिम फेरी १५व्या अध्यायावर — पुरुषोत्तम योग — आधारित होती. मुलांनी स्पर्धेसह चिन्मया विभूतीतील विविध आध्यात्मिक स्थळांना भेट दिली; पालकांनी ध्यान-चिंतन सत्रांचा अनुभव घेतला. विजेत्यांचा सत्कार करताना स्वामी स्वरूपानंद म्हणाले, "खरा विजय बक्षीसात नसून गीतेशी सुरू झालेल्या आयुष्यभराच्या नात्यात आहे." गीता जयंतीपूर्वसंध्येला स्वामी स्वरूपानंदांनी 'गीता पंचामृत' उपक्रमाचे उद्घाटन केले — गीतेतील निवडक पाच श्लोक सर्वांसाठी सोप्या रीतीने आत्मसात करण्याची ही नवी संकल्पना आहे. सेंट्रल चिन्मया मिशन ट्रस्टच्या सीईओ मनिषा खेमलानी यांनी सांगितले की, २०२६ मधील स्पर्धा १२व्या अध्यायावर आधारित असेल, तर डिसेंबर २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय अंतिम फेरीत १२+ देशांतील स्पर्धक सहभागी होतील.

### मंचर नगरपंचायतीच्या मतदानासाठी मतदारांचे 'निमंत्रण' व्यवस्थित

मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या मतदानासाठी मंगळवार दि.२ रोजी मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणणे–नेणे यासाठी उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी चांगलीच तयारी केली होती.मतदानाचा दिवस उजाडताच विविध प्रभागांमध्ये वाहनांची रांग लागली होती.मतदारांना घरातून मतदान केंद्रापर्यंत आणि मतदानानंतर परत घरी सोडण्यासाठी ने-आण सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. जेष्ठ नागरिक, महिला आणि दुर्गम वस्तीतील मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोचण्यात अडचण येऊ नये म्हणून खास चारचाकी, जीप आणि दुचाकी वाहनांची सोय करण्यात आली. अनेक ठिकाणी तर घराजवळच वाहन पोहोचवून मतदारांना केंद्रापर्यंत सुरक्षितपणे आणण्याची व्यवस्था कार्यकर्त्यांनी केली होती.यासोबतच मतदारांनी केंद्रावर पोहोचल्यावर त्यांच्यासाठी चहा, पाणी आणि हलका नाश्ता यांचीही मुक्त व्यवस्था करण्यात आली.प्रभागनिहाय उभारलेल्या मदत केंद्रांवर कार्यकर्ते सतत उपलब्ध राहून मतदारांचे मार्गदर्शन करत होते."मतदानासाठी आलेल्या मतदारांना कोणतीही गैरसोय होऊ नये" याची विशेष काळजी घेतली जात असल्याचे अनेकांनी सांगितले.उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी मतदारांचा मान आणि सोय पाहून मोठ्या उत्साहात सेवा केली.मतदानाची टक्केवारी वाढावी आणि आपापल्या उमेदवाराला भक्कम पाठिंबा मिळावा, या उद्देशाने सर्व पक्ष आणि पॅनेलने मतदारांकरता उत्कृष्ट व्यवस्था केल्याचे दिसून आले.

# अकोल्यात उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर

**३७ कोटी ८५ लाख निधीत १०० बेडची होणार व्यवस्था**

अकोले : (समर्थ गांवकरी)

शहरात सुमारे ३७ कोटी ८५ लाख रूपये निधी मंजूर असलेल्या १०० बेडचे उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम सुरू असून प्रगती पथावर आहेत.

तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र ११ तर ७२ उपकेंद्रे असून सुमारे अडीच लाख जनतेची आरोग्यसेवा या केंद्रावर अवलंबून आहे.आदिवासी भागातील मोलमजुरी करणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबियांना मजुरी बुडवून शहरात उपचार घेणे परवडत नसल्याने या आरोग्य केंद्रावर अवलंबून राहावे लागते. परंतु अकोले तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर, कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे आरोग्यसेवेचा लाभ बहुतांश रुग्णांना मिळत नाही. तालुक्यात राजूर,समशेरपुर, कोतुळ,अकोले या चार ग्रामीण रुग्णालये आहेत.अकोल्यात फक्त ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय होते.त्यात १० कर्मचारी, १ रूग्णवाहिका, २ डॉक्टरावर सध्या सरकारी कर्मचारी आहेत.

अनेक वर्षापासून अकोले तालुक्यात उपजिल्हा रुग्णालयासाठी शासन दरबारी पाठपुरावा केल्याने शासनाने ३७ कोटी ८५ लाख रुपयाचा निंधी मंजूर करण्यात येऊन १०० बेडची व्यवस्था होणार आहे.या उपजिल्हा



रुग्णालयात सोनोग्राफी, भुलतज्ञ, एमडी मेडिसिन, एक सर्जन, एक स्त्रीरोगतज्ञ, १५ मेडिकल ऑफिसर, कर्मचारी, स्केक बाईट कक्ष, सर्जरी विभाग, नोंदणी कक्ष,अपघात विभाग,सोनोग्राफी, फिजिओथेअरपी,लॅबोरेटरी,पोलिस चौकी,बालरुग्णालय विभाग,एक्स-रे विभाग,ईसीजी विभाग,दंतविभाग शल्यचिकित्सक,बाह्यरुग्ण विभाग,महिला व पुरुष प्रसाधन गृहे,शस्त्रक्रिया विभाग,सर्वसाधारण कक्ष,महिला व पुरुष प्रसाधन गृहे,ऑपरेशन थिएटर,लेबर रुम,नर्सेस रुम,डॉक्टर रुम,आय सी यु कक्ष, रेन वॉटर हार्वेस्टीग,पाणी पुरवठा,अंतर्गत व बाह्य विद्युतीकरण,अग्नीशमन यंत्रणा, सी.सी.टी.व्ही,संरक्षक भिंत आदि सोईसुविधा होणार आहे.

तसेच महात्मा फुले योजना अंतर्गत सोईसुविधा आणि १०० बेडची व्यवस्था, यांसह अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

त्यामुळे, उपजिल्हा रुग्णालय झाल्यानंतर अकोले तालुक्यातील आरोग्याची सुविधा सुटणार आहे. तसेच सध्याची इमारत पाडून नव्याने इमारत उभारली जात आहे. ही दोन मजली इमारत असेल, ७३२६.४८ चौरस मिटरचे बांधकाम होणार आहे.

## मंचर-निघोटवाडी फाटा येथे श्री दत्त जयंती सोहळा

मंचरः (समर्थ गांवकरी)

मंचर-निघोटवाडी फाटा ता.आंबेगाव येथे श्री दत्त जयंती सोहळा गुरुवार दि.४ रोजी साजरा होणार आहे.तसेच शुक्रवार दि.५ रोजी ही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती ग्रामस्थ धनेश राऊत यांनी दिली गुरुवारी सकाळी ६ ते ८ वाजता श्री दत्त पूजा अभिषेक,सकाळी ८ ते ८.३० वाजता होम हवन, सकाळी १०.३० ते १२.३० वाजता धर्माचार्य रोहिदास महाराज भोर यांचे दत्त जन्म उत्सव कीर्तन होणार आहे. संध्याकाळी ४ ते ५ वाजता चौंडेश्वरी महिला भजनी मंडळ यांचे भजन होईल. संध्याकाळी ७.३० वाजता महाआरती, रात्री ९ ते १२ वाजता सर्व धर्मीय प्रसादिक भजनी मंडळ यांचे सुश्राव्य भजन होईल. शुक्रवार दि.५ रोजी सकाळी साडेनऊ ते साडेदहा वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर पारायण मंडळ मंचर यांचे पारायण होणार आहे.सकाळी ११ ते दुपारी ३.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

## एचडीएफसी बँके तर्फे ५ डिसेंबर रोजी रक्तदान मोहिमेचे आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे त्यांच्या राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान मोहिमेचे आयोजन त्यांच्या महत्त्वपूर्ण अशा सीएसआर उपक्रम असलेल्या परिवर्तनच्या अंतर्गत करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे आयोजन संपूर्ण भारतातील ११०० शहरांत ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.३० दरम्यान करण्यात येणार आहे. या मध्ये एचडीएफसी बँकेचे कर्मचारी, ग्राहक, कॉर्पोरेट्स, संरक्षण क्षेत्रात कार्यरत सदस्य, विद्यार्थी आणि नागरीक सहभागी होणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून एचडीएफसी बँकेकडून समाजाच्या कल्याणासाठीची वचनबध्दता अधोरेखित होत असून सातत्याने देशाच्या सुरक्षित आणि वेळेत रक्त उपलब्ध करुन देण्यासाठीचा सहयोग अधोरेखित होत आहे. वार्षिक रक्तदान मोहिम ही बँकेच्या सीएसआर अंतर्गत आयोजित करण्यात येणारा पहिला उपक्रम असून तो बँकेच्या आरोग्य आणि स्वच्छता विभागाच्या अंतर्गत आयोजित केला जातो.

HDFC BANK

एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कैझाद भरुचा यांनी सांगितले " अनेक वर्षांपासून या उपक्रमाच्या माध्यमातून एकाच लक्ष्यासाठी अनेक लोक एकत्र येत आहेत. रक्त दान करणे ही एक सोपी गोष्ट आहे ज्यामुळे कोणाचा तरी जीव वाचू शकतो.

आम्ही स्वयंसेवक आणि भागीदारांचे आभारी आहोत जे दरवर्षी या प्रयत्नांना सहकार्य करतात." एचडीएफसी बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री भावेश झवेरी यांनी सांगितले " वार्षिक रक्तदान मोहिमेला दरवर्षी अगदी उत्साहाने वाढता प्रतिसाद मिळत असतो कारण आमचे कर्मचारी आणि भागीदार अगदी संघभावनेने वाहून घेऊन काम करत असतात.

हा उपक्रम सातत्याने वाढीस लागल्या बद्दल आंम्हाला अभिमान वाटतो आणि आंम्ही नेहमीच देशाच्या आरोग्यव्यवस्थेत आमचे योगदान देण्यास वचनबध्द आहोत. प्रत्येक दाता हा एकत्रित प्रयत्न करुन त्यांचे सक्षम योगदान देत असतो."

दरवर्षी बँके तर्फे प्रतिथयश अशा रक्तपेढ्या आणि आरोग्य संस्थां बरोबर काम करुन सुरक्षित, पारदर्शक आणि वैद्यकीय निकषांचे पालन करुन काम करत असते. या वर्षी या मोहिमेचे आयोजन हे संपूर्ण देशभरांतील प्रतिथयश अशा रक्तपेढ्या, सरकारी विभाग आणि सामाजिक संस्थांबरोबरच्या भागीदारीतून करण्यात येत आहे.

## मतमोजणी पुढे ढकल्याने उमेदवारांमध्ये चिंतेचे सावट; अफवांनी वाढवली घालमेल

मंचर : (समर्थ गांवकरी)

नगरपंचायती निवडणुकीची मतमोजणी रविवार दि.२१ रोजी होणार असल्याने उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची विविध अफवांमुळे घालमेल वाढली आहे.मत मोजणी पुढे ढकल्याने उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी नाराजी व्यक्त केली.

एकूण सोळा नगरसेवक पदांसाठी तसेच एक नगराध्यक्ष पदासाठी मंगळवार दि.२ रोजी शांततेत मतदान पार पडले. मतदानाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली असली तरी आता रविवार दि.२१ रोजी सकाळी होणाऱ्या मतमोजणीपर्यंत उमेदवारांची धडधड मात्र चांगलीच वाढली आहे.मतमोजणीला १९ दिवस शिल्लक असताना उमेदवारांमध्ये अनिश्चिततेचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.स्वतःच्या प्रभागात नेमके किती मतांची भर पडली असेल, कोणत्या बूथवर किती समर्थकांनी मतदान केले असेल, याची सतत चर्चा सुरू आहे.

काही प्रभागात मतदारांची अपेक्षेपेक्षा कमी झालेली टक्केवारी पाहता उमेदवार अस्वस्थ झाले आहेत.त्यातच "आपलेच काही कार्यकर्ते मतदानाच्या वेळी निष्क्रिय राहिले", "समोरच्यांनी पैसे देऊन काही मतदार हलवून घेतले", "एक-दोन प्रमुख समर्थकांनी विरोधी असलेल्या समर्थकांची भेट घेतली."

अशा अफवा पसरू लागल्याने उमेदवारांची बेचैनी आणखी वाढली आहे.

या चर्चांमुळे अनेकांची रात्र जवळजवळ जागीच गेल्याचे बोलले जात आहे.काही उमेदवारांनी आपल्या कार्यकर्त्यांना फोनवरून सतत संपर्क साधून मतदानाच्या दिवशी केलेल्या कामाचा ताळेबंद मागविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.तर काहीजण मतमोजणीपूर्वी शुभेच्छा आणि मानसिक आधार मिळावा म्हणून समर्थक व मान्यवरांच्या भेटी घेत आहेत.रविवार दि.२१ रोजी सकाळी मतमोजणी सुरू होताच निकालाची पहिली चाचपणी मिळेल. त्यावरूनच पुढील राजकीय चित्र स्पष्ट होणार असल्याने सर्वच उमेदवारांचे लक्ष मतमोजणी केंद्रावर खिळले आहे.

## सरपंच पती सह चार व्यक्तींवर कोयता गॅग कडुन जीवघेणा हल्ला

जामखेड : (समर्थ गांवकरी)

■ जामखेड पोलीस स्टेशनला 307 गुन्हा दाखल

जामखेड तालुक्यातील झिक्री गावात सरपंच पती मिलिंद जीवडे व त्यांच्या चार साथीदारांवर तलवार, कोयता, रॉड व काठ्यांनी झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने एकच खळबळ उडाली आहे. रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहाराबाबत ग्रामसभेत व पंचायत समितीसमोर तक्रार करण्यात आली होती. याचाच राग मनात धरून आरोपी योगेश इथापे व त्याचे साथीदार घनश्याम कसाब, ऋषीकेश साळुंके, मयुर कसाब, अतुल कसाब आणि इतर 4–5 अनोळखी व्यक्तींनी नऊ ते दहा जणांच्या टोळीने जीवडे, त्यांचे चुलते आणि सोबतच्या लोकांवर हल्ला केला. तलवार व कोयत्याने केलेल्या वारांमुळे जीवडे गंभीर जखमी झाले, तर त्यांच्या सोबतच्या चौघांनाही मारहाण करून जखमी करण्यात आले. शिवाय दत्तात्रय साळुंके यांच्या चारचाकी गाडीचेही मोठे नुकसान करण्यात आले.

# एकाग्रता, बौद्धिक विकास व शारीरिक तंदुरुस्तीसाठी बुद्धिबळ उपयुक्त : संजय चोरडिया

**'सूर्यदत्त'मध्ये आयोजित पाचव्या आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद**

पुणे : (समर्थ गांवकरी)

सूर्यदत्त नॅशनल स्कूल, सूर्यदत्त फिटनेस अँड स्पोर्ट्स अकॅडमी आणि पुणे डिस्ट्रिक्ट चेस सर्कल (पीडीसीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी आंतरशालेय खुल्या बुद्धिबळ स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. शालेय स्तरावरील या भव्य स्पर्धेत विविध ८० नामांकित शाळांमधील ७, १०, १५ व २० वर्षांखालील अशा चार गटात ५०० पेक्षा स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये झालेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्ता, निर्णयक्षमता आणि रणनिती कौशल्यांचे दर्शन घडले. एक लाखाहून अधिक रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रांचे यावेळी वितरण करण्यात आले. सात वर्षांखालील गटात समर कोरे, विहान कांबळे, अनिरुद्ध नगरकर, ऋणवी रणदिवे, कशिव चाकवे, १० वर्षांखालील गटात सर्वज्ञ बालगुडे, राजवीर दिवे, अर्जुन कौलगुड, हेयान रेड्डी, शौर्यराज बगाडे, १५ वर्षांखालील गटात अविरत चौहान, कवीन मथियाझागन, लथिक राम, श्रेयस सरदेशमुख, रेयांश झाड, तर २० वर्षांखालील गटात अर्णव कदम, ओजस देवशतवार, कुशाग्र जैन, अक्षय जोगळेकर व मिहीर सरवदे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक पटकवला. उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देण्यात आले. सर्व सहभागींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पालकांनी संपूर्ण दिवस मुलांसोबत घालवला. मुलांना प्रोत्साहन दिले. मुलांबरोबर आलेल्या पालकांचीही उत्तम सोय करण्यात आली होती. त्याबद्दल पालकांनी आनंद व्यक्त केला. महाराष्ट्र चेस सर्कलचे उपाध्यक्ष राजेंद्र कोंडे, फिडे इंटरनॅशनल ट्रेनर जयंत गोखले व फिडे मास्टर गौरव आणि फिडे ट्रेनर जयसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. सर्व मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रसंगी 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आव्हानांना सामोरे जाण्याचे, खंबीर राहण्याचे आणि निष्ठा व आत्मविश्वासाने आपल्या कौशल्यांना अधिकाधिक सक्षम करण्याचे आवाहन प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले की, सामना हरणे किंवा जिंकणे हे महत्वाचे नाही, तर आपल्याला मिळालेल्या संधीतून नव्या गोष्टी शिकणे अधिक महत्वाचे असते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्ता वाढवण्यासह त्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. युवापिढीला मोबाइलपासून दूर ठेवत वाचन, लेखन, विचार आणि शारीरिक तंदुरुस्ती याकडे नेण्याचा हा प्रयत्न आहे. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांना क्रीडा व कौशल्यांचा विकास साधता यावा, यासाठी सूर्यदत्त संस्था नेहमीच अशा नाविन्यपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रमांना प्रोत्साहन देते. त्यातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक तंदुरुस्तीला, ध्येयासक्ती आणि शिस्तीला चालना मिळते."

# मंचर : सखी मतदान केंद्राचा आकर्षक उपक्रम

## मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर (ता.आंबेगाव) येथे झालेल्या नगरपंचायत निवडणुकीदरम्यान मतदान करण्यासाठी जिल्हा परिषद मराठी शाळेत उभारण्यात आलेले सखी मतदान केंद्र विशेष आकर्षणाचा विषय ठरला. महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या या केंद्राची सजावट पूर्णपणे गुलाबी रंगाच्या थीमवर आधारित होती. प्रवेशद्वारावर गुलाबी रंगाचे फुगे आणि आकर्षक सजावट करून मतदारांचे लक्ष वेधण्यात आले.

मतदान हा प्रत्येक नागरिकाचा कर्तव्यभाव जपणारा उपक्रम आहे आणि लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक मत महत्त्वाचे आहे, या संदेशासह विविध प्रेरणादायी फलक मतदान केंद्रावर लावण्यात आले होते. यामुळे केंद्रावर येणाऱ्या मतदारांमध्ये उत्साह अधिक वाढल्याचे दृश्य पाहायला मिळाले.विशेष म्हणजे मतदान केंद्राच्या बाहेर सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता.




मतदान करून बाहेर पडणाऱ्या मतदारांनी या सेल्फी पॉईंटमध्ये उभे राहून फोटो काढण्याचा आनंद लुटला. अनेकांनी मतदानाचा अभिमान व्यक्त करत आनंदाने सेल्फी घेतली आणि ती सोशल मीडियावर शेअर करून मतदानाचा संदेश पुढे पोहोचवला.सखी मतदान केंद्राच्या या आकर्षक उपक्रमामुळे मतदारांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून लोकशाही प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधिक उत्साही आणि प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त होत आहे.




संगमनेर तालुका : नाशिक - पुणे महामार्गाचे काम सुरू असून त्यातील अत्यंत वर्दळीचे ठिकाण असलेले सायखिंडी फाटा (ता.संगमनेर) येथेही महामार्गाच्या दोन्ही बाजूला मोठे काम पुलांचे सुरू असून दोन्ही बाजूंनी रस्त्याच्या बाजूला पुलाच्या कामाकरीता मोठ मोठे खड्डे खोदून काम सुरू आहे.परंतु या फाट्यावर मोठ्या प्रमाणात प्रवासी, विद्यार्थी यांची मोठी वर्दळ असते.

# केंद्र व राज्य सरकारच्या योजना शहरातील घराघरात लाभ देण्यासाठी याच विचाराचे निवडून

## मुख्यमंत्री फडणवीस

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथे होणार नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्य मंत्री फडणवीस जहीर सभेत बोलताना पुढे म्हणाले की. केंद्र सरकारच्या योजना आपले राज्य सरकार प्रभावी पणे अंमलबजावणी करत आहे.. त्याचा लाभ लाखो लोकांना मिळत आहे. उदा प्रधानमंत्री घर कुल... म्हाडा प्रकल्प. सौर ऊर्जा.. आयुष्यमान योजना. घर घरपिणयाचे पाणी. स्वच्छ व सुंदर शहर आदी योजना जामखेड शहरात राबविण्यासाठी आपल्याच विचाराचे लोक निवडून द्या.. ज्याच्या हाताला धरून काम करून घेता येईल. प्रसंगी कान धरून काम करून घेण्यासाठी भाजप प्रणीत पॅनलचे 25 उमेदवारांना व नगराध्यक्ष पदासाठी सौ. प्रांजल अमित चिंतामणी यांना प्रचंड मतांनी विजयी करावे.. मागील काळात शहरांकडे दुर्लभ झाले. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बेकारी.. पिण्याचे पाणी.. सांडपाणी.. रस्ते. आरोग्य. शिक्षण. महिला सक्षमीकरण. आदी प्रश्न सोडविण्यासाठी आपण एकत्र येऊन काम करू. मा. पंतप्रधान मोदी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक योजना आखल्या आहेत. आमंबलबजावणी चालू आहे. तो विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी भाजपचे उमेदवार निवडून आले पाहिजे. मतदारांनी दोन तारखेस आपले पवित्र.. बहुमोल मत या उमेदवारांना मतदान करा. विकासाची गंगा पुढे नेण्यासाठी सहकार्य करा. या प्रसंगी विधान परिषद चे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जामखेड करांच्या वतीने मुख्यमंत्री यांच्या कडे काही प्रमुख मागण्या मांडल्या.. या मधे शहरातील रस्ते.. भुमीगत सांडपाणी योजना. घरकुल योजना. नगर पालिकेत शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कायद्यात बदल केला पाहिजे. आदी मागण्या बाबत सकारात्मक प्रतिसाद दिला.. मा. शिंदे सर हे हेड मास्तर आहेत.. आम्ही त्यांचे विद्यार्थी आहोत.. कारण ते वरीष्ठ सभागृहाचे सभापती आहेत. आम्हाला आदेश देऊ शकतात.. त्यामुळे या शहरासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. राज्य शासनाच्या विविध योजना प्रत्यक्षात लाभ मिळण्यासाठी या उमेदवारांना मतदान करा.



असे नम्र आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. याप्रसंगी जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांनीही मनोगत व्यक्त केले. या सभेस आ. सुरेश धस, आ. टिळेकर, जिल्हा अध्यक्ष भालसिंग, ता अध्यक्ष ढवळे, अजय काशिद, अमित चिंतामणी, झेंडे डॉक्टर, बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, कर्जत येथील पै. घुले पाटील, कैलास शेवाळे, तालूका अध्यक्ष भाजप बाजार समिती सभापती कर्जत आदी मान्यवर उपस्थित होते. हाजोरोंचया संख्येने नागरिक उपस्थित होते. सभेस सकारात्मक प्रतिसाद मिळाला. वातावरण निर्मिती करण्यासाठी या सभेचा फार मोठा वाटा आहे. भाजप प्रणीत पॅनल निश्चितपणे बहुमत मिळवील असी खात्री भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने व्यक्त केली.

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांची आळंदी मंदिरास भेट दर्शन

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सद्दिच्छा भेट दिली. गीता जयंती निमित्त वेदश्री तपोवन येथे एका कार्यक्रमा निमित्त ते आळंदी समीप आले होते. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या सद्दिच्छा भेटीत श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दर्शन घेतले.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी समाधी समोर पूजा करीत मनोभावे श्रींचे दर्शन घेतले. या प्रसंगी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब,विश्वस्त ॲड. राजेंद्रजी उमाप, आळंदीतील राष्ट्रीय युवा कीर्तनकार विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, विश्वस्त ॲड. रोहिणीताई पवार उपस्थित होते. यावेळी देवस्थान तर्फे त्यांनी स्वागत करीत संवाद साधून देवस्थान चे कामकाजाची माहिती दिली.

आळंदीत पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया सुरु असून या दरम्यान प्रचाराचा शेवटचा दिवस आणि राज्यपाल यांची आळंदी मंदिरास सद्दिच्छा भेट तसेच एकादशी असल्याने मंदिर परिसरात विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान आळंदीत

# गौण वनोपज वाहतूक परवाना अधिकार ग्रामसभांकडे

## आदिवासी विकास विभागाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

वनहक्क व पेसा कायद्यानुसार गौण वनोपज वाहतूक परवाना अधिकार ग्रामसभांकडे घेण्यात आला आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या निर्णयाला महत्व प्राप्त झाले आहे.असे मत घोडेगाव येथील प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी व्यक्त केले.

या संदर्भात दिलेल्या प्रसिद्धी पत्रकामध्ये प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी म्हटले आहे की अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारीत नियम २०१२ तसेच पंचायतराज व्यवस्था १९९६ नुसार ग्रामसभांना गौण वनोपजाच्या वाहतुकीसंदर्भात असलेले अधिकार प्रत्यक्षात राबविण्यासाठी स्वतंत्र परवाना निर्गमनाचे अधिकार आता थेट ग्रामसभांना प्रदान केले आहेत. यापूर्वी गौण वनोपज वाहतूक परवाने वनविभागामार्फत दिले जात होते.मात्र नवीन कार्यपद्धतीनुसार ग्रामसभा स्वतः वाहतूक परवाना छापून, क्रमांक जारी करून व निर्गमित करून संबंधित वन कार्यालयास माहिती देऊ शकतील. यामुळे वनहक्काच्या कायद्याने ग्रामसभांना दिलेले अधिकार प्रत्यक्षात बळकट होऊन स्थानिक आदिवासी व वननिवासी समाजाला स्वायत्तता लाभणार आहे.शासन निर्णयातील ठळक बाबी गौण वनोपज वाहतूक परवाना निर्गमनाचा पूर्ण अधिकार ग्रामसभांकडे आल्याने वनविभाग यापुढे या परवान्यांसाठी अर्ज स्वीकारणार नाही.ग्रामसभेने जारी केलेल्या परवान्याचा क्रमांक संबंधित वन विभागास कळविणे बंधनकारक. जारी परवान्याची प्रत बिटगार्ड व वन कार्यालयाला सादर करणे आवश्यक.कोणताही संभ्रम निर्माण झाल्यास जिल्हास्तरीय वनहक्क समिती निर्णय घेईल. तथापि ग्रामसभेचे अधिकार अबाधित राहतील.पुढील काळात प्रक्रियेचे डिजिटलायझेशन, क्युआर कोड आधारित परवाना प्रणाली लागू करण्याची मुभा ग्रामसभांना राहील.या निर्णयामुळे आदिवासी पेसा क्षेत्रातील ग्रामसभांना अधिकार प्राप्त होऊन स्वावलंबन व आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे.वनसंपत्तीवरील समुदायाधिकार प्रत्यक्षात येण्यास मोठा हातभार लागेल, असे मत प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी व्यक्त केले.

# घोडेगाव येथे प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**मंचर: (समर्थ गांवकरी)**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव ता.आंबेगाव येथे प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते झाले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल नियुक्त जनजाती सल्लागार परिषदेचे किरण गभाले,प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई होते.घोडेगाव, तेरुंगण, खटकाळे, तळेरान व बामणोली या पाच केंद्रातील आश्रम शाळेतील



मुख्याध्यापक, विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.याप्रसंगी घोडेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष संगीता मोदे,प्रकल्प कार्यलयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रियंका घनवट, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सोनुल कोतवाल व लेखाधिकारी राजेंद्र येळीकर उपस्थित होते.स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल, धावण्याच्या शर्यती, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, लांब उडी, उंच उडी अशा विविध स्पर्धांचा समावेश आहे. प्रकल्पस्तरीय आयोजन समितीचे अध्यक्ष प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई म्हणाले विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये अधिकाधिक नाव उंचावून राज्यस्तरावर आपल्या प्रकल्पाचे नाव घेऊन जावे,यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.प्रकल्पातील विभाग समित्यांनी केलेल्या सहकार्यामुळे उद्घाटन सोहळा यशस्वीपणे पार पडला. प्रास्ताविक शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळा घोडेगावचे प्राचार्य चंद्रकांत नाईकडे यांनी केले.

# तीर्थक्षेत्र आळंदीचे विकासाची ग्वाही; मतदानासाठी आवाहन

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

येथील नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत तीर्थक्षेत्र आळंदीचे विकासास गती देण्यासाठी सर्वांगीण विकास करण्यासाठी पुण्याचे पालकमंत्री राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विकासाची ग्वाही देत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रकाश कुऱ्हाडे यांचेसह सर्व राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मतदान करून राष्ट्रवादी काँग्रेस ला साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले.आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रकाश कुऱ्हाडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार यांचे प्रचारार्थ आळंदीत आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी पक्ष संघटनेतील पदाधिकारी, उमेदवार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी आळंदीतील विविध विकास कामांचा आढावा घेत अधिकचे विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस चे उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करीत आळंदीचे सर्वांगीण विकासाची ग्वाही देत मतदारांशी संवाद साधला.

# युवा वेदमूर्ती देवव्रत यांची श्रीक्षेत्र काशी येथे भव्य मिरवणूक व उत्कट सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थान शारदापीठ शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांचे ज्यांना आशीर्वाद आहेत, ते युवा वेदमूर्ती, वेदमहर्षी देवव्रत महेश रेखे या बृहस्पतीस्वरूप आत्म्यास आम्ही काय आशीर्वाद द्यावा, असे गौरवोद्गार श्रीक्षेत्र काशी येथील आचार्य राजाराम शुक्ल यांनी, येथील श्रुती स्मृती ज्ञानमंदिर वेद पाठशाळेचा युवा वेदमूर्ती देवव्रत यांच्या काशी येथील 50 दिवसांच्या दण्डक्रम पारायण सोहळ्याच्या समारोपप्रसंगी तसेच देवव्रत यांना महान तपस्वी व दण्डक्रम महाविक्रमादित्य ही पदवी प्रदान करताना म्हटले आहे.

वैदिक क्षेत्रातील सर्वांत कठीण असे दण्डक्रम पारायण



कंठस्थ केवळ 50 दिवसांत पूर्ण करून वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांनी विश्वविक्रम केला आहे. भारतीय परंपरेत आजपर्यंतच्या इतिहासात काशी क्षेत्रात असे एकमेव पारायण झाले असल्याची नोंद यानिमित्ताने होत असून असे वेदमूर्ती निर्माण व्हावेत, अशी सदिच्छा यावेळी करण्यात आली.

वाराणसी येथील श्री शृंगेरी शंकराचार्य मठ मोहमूरगंज येथे 29 नोव्हेंबर रोजी सायंकाळी अनेक संत, महंत, घनपाठी युवा, विद्यार्थी आदि मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी आचार्य हृदयरंजन शर्मा होते. श्री श्री महेश चैतन्य ब्रह्मचारी महाराज, श्री श्री महंत शंकर पुरी महाराज त्याचप्रमाणे वाराणसी येथील विविध मठांतील महंत वेदशाळेचे वेदशास्त्री प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

वेदमहर्षी देवव्रत रेखे यांच्या पारायण समारोपाच्या निमित्ताने दण्डक्रम पारायण करता अभिनंदन समिती वाराणसीच्या वतीने चल्ला अन्नपूर्णा प्रसाद, श्री चल्ला सुब्बाराव, श्री अनिल किंजवडेकर, श्री वेंकटरमण घनपाठी, चंद्रशेखर द्रविड, माधव रटाटे, पांडुरंग पुराणिक, बडानंद पाठक यांच्यावतीने देवव्रत यांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी महाराष्ट्रासह मद्रास, कर्नाटक, गुजरात, आंध्र, तामिळनाडू, मध्य प्रदेश येथील अनेक युवा वेदपाठी, घनपाठी, वैदिक वेद पाठशाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागपूर येथील प्रसिद्ध नादस्वर शिवगर्जना या बँड पथकाने काशी क्षेत्रात आपल्या वाद्यांची अद्भुत पूर्व कला सादर करून नावलौकिक केला. शिवगर्जना पथकातील युवक-युवतींनी ढोल वादन करून झांजाच्या स्वरातून डमरू व शंखध्वनीचे सूर काढून प्रत्यक्ष शंकर महादेव येथे तांडव नृत्य करीत आहेत, असा आभास निर्माण केला.

या भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये वेदनारायणाच्या मंत्रघोषासह पारंपरिक पोशाखात शिवस्तुतीच्या स्वरांनी काशी क्षेत्रात एक अद्भुत अशी ही शोभायात्रा निघाली. वैदिक कार्यासाठी मुख्य रस्त्यावरून आजपर्यंत अशी नेत्रदिपक शोभायात्रा कधीही निघाली नसल्याचे येथील जाणकार नागरिकांनी सांगितले. मिरवणूक मार्गावरील अनेक मुख्य चौकांत, रस्त्यावर विविध धार्मिक संघटना तसेच भाविकांनी पुष्पवृष्टी करून देवव्रतचे स्वागत केले. स्वर्गातील देव-देवता वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांच्यावर पुष्पवृष्टी करीत असल्याचा आभास यावेळी निर्माण झाला.

## थोडक्यात बातम्या...



### खडकी येथील काळभैरवनाथ विद्यालयात गीता जयंती साजरी

मंचर (स. गांवकरी) : खडकी ता.आंबेगाव येथील काळभैरवनाथ सौ.लक्ष्मीबाई बाबुराव बांगर विद्यालयात मोक्षदा एकादशीच्या निमित्ताने गीता जयंती साजरी करण्यात आली. भगवद्गीता ग्रंथाचे मुख्याध्यापक अविनाश ठाकूर व शिक्षकांच्या हस्ते पूजन करण्यात आले. शिक्षिका ज्योत्स्ना खेडकर यांनी भगवद्गीतेचे महत्त्व स्पष्ट करत निवडक श्लोकांचा अर्थ सांगितला.भगवान श्रीकृष्णांच्या विभूती, भक्तांचे प्रकार व भक्तीचे स्वरूप यावर त्यांनी मार्गदर्शन केले.विद्यार्थिनी पूर्वा टेमगिरे हिने मनोगत व्यक्त केले.विद्यार्थ्यांनी भगवद्गीतेचा अध्याय 12 व अध्याय 15 यांचे सामूहिक पठण केले.कार्यक्रमाचे नियोजन माणिक हुले, रूपाली ठाकूर,माधुरी थोरात, प्रभाकर झावरे,शरद पाबळे, धम्मपाल कांबळे,अरुण सरोदे, संतोष खालकर, रामदास लबडे, रामचंद्र फलके, संजय नेहरे यांनी केले.आभार मंगल सोनार यांनी मानले.

### मंचर येथे जेष्ठ आजीने बजावला मतदानाचा हक्क



मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता मंगळवार दि.२ रोजी मतदान सुरु आहे. बिबट्याची दहशत असतांना अलका दोशी या ७३ वर्षीय आजीने न घाबरता मंचर नगरपंचायत प्रभाग ४ अंतर्गत जिल्हा परिषद शाळा लोंढेमळा ता.आंबेगाव येथील मतदान केंद्रावर सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावला, देशाची लोकशाही बळकटीकरणाच्याकामी बिबट्याची दहशत बाळगण्याची गरज नाही, मतदारांनी पुढे येवून मतदान करावे.असे आवाहन अलका दोशी यांनी केले आहे. मतदार अलका दोशी म्हणाल्या, मतदान करणे हा आपला हक्क आहे, निवडून येणाऱ्या सदस्यांना मतदार म्हणून आपण हक्काने विकास कामे करण्याबाबत सांगू शकतो.लोकशाहीकरिता आपण काहीतरी केले पाहिजे, या भावेनेने मतदारांनी पुढे येवून मतदानांचा हक्क बजावला पाहिजे, असे आवाहन अलका दोशी यांनी केले.



### बबाबाई बांगर यांचे निधन

मंचर (स. गांवकरी) : चांडोली खुर्द ता.आंबेगाव येथील बबाबाई तुकाराम बांगर वय 90 यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या मागे एक मुलगा, सहा मुली असा परिवार आहे.माजी सरपंच बी.टी. बांगर यांच्या त्या मातोश्री होत.

### 'बिग बॉस' विजेता सूरज चव्हाणच्या लग्नाला गर्दीमुळे उशीर

पुणे (स. गांवकरी) : 'बिग बॉस' विजेता सूरज चव्हाण आणि संजना यांच्या विवाह सोहळ्याला महाराष्ट्रभरातून अभूतपूर्व गर्दी झाली. अनपेक्षित वाढलेल्या या गर्दीमुळे लग्नाला तब्बल दोन तास उशीर झाला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता पाहता, पुण्यातील एस. एस. टी. बाउन्सर सेक्युरिटी गार्ड सर्व्हिसेस या नामांकित सुरक्षा कंपनीने मोफत ५० बाउन्सर्सची तत्काळ व्यवस्था करून मोठी मदत केली. कंपनीचे संचालक व युवा उद्योजक संग्रामसिंग टाक यांनी स्वतः पुढाकार घेऊन ५० जणांची सुरक्षा टीम लग्नस्थळी रवाना केली. सासवड–जेजुरी रोडवरील खळद येथील माऊली गार्डन हॉल येथे २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता विवाहसोहळा आयोजित करण्यात आला होता. वाढती गर्दी पाहता, एसएसटीच्या बाउन्सर टीमने अल्पावधीतच परिस्थिती नियंत्रणात आणत कार्यक्रम निर्विघ्न पार पडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. या मदतीबद्दल सूरज, संजना आणि त्यांच्या कुटुंबीयांनी संग्रामसिंग टाक आणि संपूर्ण एसएसटी टीमचे मनापासून आभार मानले.

### शिक्षण परिषदेतून शिक्षकांना मिळणार सकारात्मक शिस्तीचे धडे : दादाजी भुसे

मुंबई (स. गांवकरी) : शिस्त ही भीतीतून नाही तर विश्वासातून निर्माण झाली पाहिजे. सकारात्मक शिस्त हीच मुलांच्या उज्वल भविष्याची खरी पायाभरणी आहे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. या अनुषंगाने त्यांनी सकारात्मक शिस्त याविषयी शिक्षण परिषदेचे आयोजन करण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाला दिले आहेत. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात शिक्षण परिषदेचे आयोजन होणार आहे. राज्यात काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेचे प्रकार समोर येत असून समाजात याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, सुरक्षित वातावरण आणि शिक्षक-विद्यार्थी नातेसंबंध अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके आणि केंद्र स्तरावरील शिक्षण परिषदांमध्ये 'सकारात्मक शिस्त' या विषयावर किमान 45 मिनिटांचे विशेष सत्र आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.